पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –६०

सभावृत्तांत

दिनांक –२०.७.२०२१ वेळ –दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **जुलै-२०२१** ची मासिक मा.महापालिका सभा **मंगळवार** दिनांक **२०/०७/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता मा.उपसचिव महाराष्ट्रशासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दिनांक ३ जुलै २०२० व दिनांक २८ जून २०२१ च्या पत्रान्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजीत करणेत आलेली आहे. मा.महापौर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरुन ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केले होते. सभेस खालील सन्मा.सदस्य संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे सभागृहातून ऑनलाईन पध्दतीने अथवा मोबाईल ऍपद्वारे उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.राहुल गुलाब जाधव

९) मा.वसंत प्रभाकर बोराटे

१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास

११) मा.तापकीर वि नया प्रदीप (आबा)

१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.गायकवाड निर्मला मनोज

१५) मा.गोफणे अनुराधा देविदास

१६) मा.बारसे प्रियांका प्रविण

१७) मा.लांडगे सारीका संतोष

१८) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१९) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२०) मा.सावळे सिमा रविंद्र

२१) मा.गिता सुशिल मंचरकर

२२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२३) मा.अनुराधा गणपत गोरखे

२४) मा.केशव हनुमंत घोळवे

२५) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२६) मा.अश्विनी भीमा बोबडे

२७) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२८) मा.संजय बबन नेवाळे

२९) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३०) मा.भालेकर प्रविण महादेव

३१) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३२) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३३) मा.पंकज दत्ताञय भालेकर

३४) मा.घोलप कमल अनिल

३५) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३६) मा.चिखले सचिन तुकाराम

३७) मा.यादव मीनल विशाल

३८) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३९) मा.राजू मिसाळ

४०) मा.शैलजा अविनाश मोरे

४१) मा.बाबर शर्मिला राजू

४२) मा.अमित राजेंद्र गावडे

४३) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४४) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४६) मा.ढाके नामदेव जनार्दन

४७) मा.भोईर सुरेश शिवाजी

४८) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४९) मा.जयश्री वसंत गावडे

५०) मा.कोमल दिपक मेवानी

५१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५२) मा.सुलक्षणा राजू धर

५३) मा.सुजाता सुनिल पालांडे

५४) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५५) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५६) मा.पाडाळे निता विलास

५७) मा.काळे उषा दिलीप

५८) मा.पवार मनिषा प्रमोद

५९) मा.अभिषेक गोविंद बारणे

६०) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६१) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६२) मा.निलेश हिरामण बारणे

६३) मा.दर्शले रेखा राजेश

६४) मा.कलाटे राहुल तानाजी

६५) मा.कलाटे मयूर पांडुरंग

६६) मा.कस्पटे संदिप अरुण

६७) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

६८) मा.सविता बाळकृष्ण खुळे

६९) मा.सुनिता हेमंत तापकीर

७०) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७१) मा.आंगोळकर सागर सुनिल

७२) मा.मुंढे उषा अंकुश

७३) मा.लोखंडे चंदा राजू

७४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

७५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

७६) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

७७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

७८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

७९) मा.नवनाथ दत्तू जगताप

८०) मा.संतोष बबन कांबळे

८१) मा.सोनवणे शारदा हिरेन

८२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

८३) मा. संजय मल्हारराव वाबळे

८४) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

८५) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

८६) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील-शहर अभियंता, मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.दुरगुडे, मा.झगडे, खोत-उपआयुक्त, मा.भालकर, मा.तांबे- सह शहर अभियंता, मा.लडकत-प्र.सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, कुलकर्णी, मा.ओंभासे, मा.भोसले, मा.मोरे, मा.देशमुख, मा.वाघुंडे-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.महापौर – उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.केशव घोळवे - मा.महापौर साहेब, चेंबुर विक्रोळीत पावसामुळे दरड कोसळून झालेल्या अपघात १३ जणांचे निधन झालेले असल्याने त्यांस तसेच शहरातील ज्ञात अज्ञात दिवंगत व्यक्तींचे निधन झालेले असल्याने त्यांस तसेच अर्चना तानाजी बारणे- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील भाजपाच्या नगरसेविका यांचे निधन, इंदुबाई भोईर – पिपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादीचे स्विकृत नगरसेवक श्री.भाऊसाहेब भोईर यांच्या मातोश्री यांचे निधन,कल्याणसिंह – ज्येष्ठ भाजपा नेते व उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री यांचे निधन, सुरेश

सोनवणे – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी उपमहापौर यांचे निधन,मिल्खा सिंह-पद्मश्री पुरस्कार प्राप्त भारताचे प्रसिध्द धावपटूटू यांचे निधन,यशपाल शर्मा – ज्येष्ठ भारतीय क्रिकेटपट्टू यांचे निधन,राज कौशल – निर्माता दिग्दर्शक यांचे निधन,दिलीपकुमार – ज्येष्ठ हिंदी चित्रपट अभिनेते यांचे निधन, विरभद्र सिंह – ज्येष्ठ काँग्रेसे नेते व हिमाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री यांचे निधन,सुधीर सोपानराव शेडगे – नगरसेवक मोरेश्वर शेडगे यांचे चुलत बंधु टाटा मोटर्सचे गुणवंत कर्मचारी यांचे निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

मा.मोरेश्वर शेडगे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर - श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा. सविता खुळे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्यमान नगरसेविका अर्चनाताई तानाजी बारणे यांचे आकस्मिक निधन झाल्याबद्दल मी त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहते. ताईंच कार्य खुप चांगलं होतं. ताईनी गेल्या साडेचार वर्षामध्ये त्यांच्या कामाचा एक चांगला ठसा उमटला होता. ताईंच्या घरच्यांनी त्यांना सहकार्य केलं होतं. पण आकस्मिक असा त्यांच्यावर घाला घातला आणि त्या आपल्यातुन निघुन गेल्या आहेत त्यांच्या या जाण्याने सर्वांना दु:ख झालेलं आहे. आणि हे दु:ख सावरण्याची शक्ती त्यांच्या कुटूंबियांना देवो आणि मी माझ्या कुटूंबियाच्या वतीने आणि प्रभागाच्या वतीने आणि शहराच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहते.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे **-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आपल्या सहकारी नगरसेविका सौभाग्यवती अर्चनाताई तानाजी बारणे यांचे दु:खद निधन झालेलं आहे. खरंतर अर्चनाताई नगरसेविका होण्याच्या आगोदर पासूनच त्यांच्या कुटूंबाशी माझा संबंध होता. अर्चनाताईंचा जनसंपर्क अतिशय चांगला होता. त्यांनी अतिशय चांगलं मोठं कार्य केलेलं आहे. अर्चनाताईंच्या जाण्यामुळे बारणे कुटूंबियांना आणि आपल्या सर्वांनाच दु:ख झालेलं आहे. त्या दु:खातुन सावरण्याची शक्ती त्यांना द्यावी आणि त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. त्यांना माझ्या शेडगे कुटूंबियांच्या वतीने आणि संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरवासियांच्या वतीने मी त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.बाबासाहेब त्रिभुवन - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आमच्या ग प्रभागातील सहकारी नगरसेविका अर्चनाताई बारणे यांचं अल्पशा आजाराने दु:खद निधन झालं आहे.अर्चनाताई या त्यांच्या प्रभागामध्ये सतत नागरीकांच्या कामासाठी आग्रही असायच्या,ताईंचा स्वभाव अत्यंत शांत आणि मनमिळाऊ होता. मी ग प्रभागाच्या आणि रहाटणीच्या वतीने आणि त्रिभुवन कुटूंबाच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो.

मा.अनुराधा गोरखे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज सौभाग्यवती अर्चनाताई बारणे यांचे दु:खद निधन झालेलं आहे. त्यामुळे खुपच वाईट वाटत आहे. कारण एवढया लहान वयात असं व्हायला नको होतं. पण ईश्वराच्या पुढे तिथं कोणाचं चालत नाही. आज त्यांच्या घरावर दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे. अर्चना आणि माझं नातं ही आईचं आणि मुलीचं होतं ती मला नेहमी आई म्हणायची आणि हे दोघेही नवरा-बायको मला कुठेही दिसले तर ते नेहमी हसतच बोलायचे तिचा चेहरा माझ्या डोळयापुढून जातच नाही. अशा या अर्चनाला माझ्या गोरखे कुटूंबातर्फे आदरांजली वाहते. आणि थांबते.

मा.हर्षल ढोरे -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज आमच्या पिंपरी चिंचवड मध्ये जी काही दु:खद घटना घडली आहे. अर्चनाताई या तुम्हां आम्हांला सोडून गेल्या आहेत. या घटनेवर आमचा अजिबात विश्वास बसला नाही.बारणे कुटूंबियावरती जो दु:खाचा जो डोंगर कोसळलेला आहे. मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो की, बारणे कुटूंबियांना या दु:खातून सावरण्याची त्यांना शक्ती देवो आणि त्यांना माझ्या प्रभागाच्या वतीने आणि ढोरे कुटूंबियांच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.सचिन चिखले - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज आपल्याच परिवारातील आपल्या आदरणीय सदस्या एक चांगलं व्यक्तीमत्व असणा-या आणि नेहमी आपल्या प्रभागात धडपडत काम करणा-या अशा आमच्या आदरणीय अर्चनाताई बारणे यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यामुळे आम्ही सर्वजण हळहळ व्यक्त करीत आहोत. जी व्यक्ती आपल्या प्रभागातील नागरीकांसाठी या सभागृहामध्ये वेळोवेळी येऊन विषय मांडत होत्या आणि नागरीकांच्या प्रश्नांसाठी झगडत होत्या. ती व्यक्ती आपल्यातुन अचानकच गेल्यानंतर आपल्या मनाला खंत वाटते. अर्चनाताईंना मी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

मा.निता पाडळे -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज आपल्यातुन माझी भगिनी अर्चनाताई बारणे या आपल्यातून निघुन गेलेल्या आहेत. अर्चनाताईंच एक चांगल व्यक्तीमत्व होतं. अर्चनाताईंचा स्वभाव शांत होता पण त्या कामासाठी कायम धडपडणारं एक व्यक्तीमत्तव होतं. अर्चनाताईंना मी माझ्या प्रभाग क्र.२२ आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

मा.मनिषा पवार - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह माझ्या पॅनलमधील सौ.अर्चनाताई बारणे यांचे दु:खद निधन झालेले आहे त्यांना माझ्या परिवाराच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आपल्या सहकारी नगरसेविका अर्चनाताई बारणे यांचे दु:खद निधन झालेले आहे त्यांना माझ्या परिवाराच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. एक आदर्श व्यक्ती आपल्यातुन निघुन गेलेली आहे. एक आदर्श माता आपल्या मुलांना सोडून गेलेली आहे. माई,या मुलांकडे पाहून मनात कसं तरी होत आहे. ती मुलं आईपासून पोरकं होणार, आई ही काय असते,कुठल्याही मुलांनी चुक केली तर त्या चुका झाकुन घेण्यासाठी आई असते. ती मुलगी जर माहेरी आली आणि तिथे जर आई नसेल तर त्या मुलीला काय वाटेल आज या संपुर्ण कुटूंबावर दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे. ते दु:ख सहन करण्याची शक्ती परमेश्वराने त्यांना द्यावी अशी प्रार्थना करते. आणि अर्चनाताईंला माझ्या कुटूंबाच्या वतीने आणि महानगरपालिकेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

मा.शारदा सोनवणे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आमच्या सहकारी अर्चनाताई बारणे यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झालेले आहे. अर्चनाताई या खांदयाला खांदा लावून चालणा-या होत्या. त्या शांत स्वभावाच्या होत्या त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

मा.उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आपल्या सभागृहातील सहकारी नगरसेविका अर्चनाताई बारणे यांचे दुखद निधन झालं आहे. आपण सर्वजण त्यांच्या दु:खातसहभागीआहोत. ताईंनाभावपुर्णश्रध्दांजलीअर्पणकरतो. त्याचप्रमाणे आमच्या निगडी भागातील माजी नगरसेवक तानाजीराव खाडे यांचे पुतणे आणि शिवाजीराव खाडे यांचे चिरंजीव ओंकार शिवाजीराव खाडे यांचे भक्तीशक्ती उड्डाणपुलावर ८/१० दिवसापुर्वी निधन झालं आहे त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी अशी विनंती करतो.

मा. योगीता नागरगोजे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आपल्या सभागृहातील सहकारी नगरसेविका अर्चनाताई बारणे यांचे दु:खद निधन झालेलं आहे. अर्चनाताई या खांदयाला खांदा लावून काम करणा-या होत्या. मागच्या मिटींगमध्ये त्या या सभागृहात होत्या आणि आज त्या आपल्या इथे नाहीत त्यामुळे अत्यंत दु:ख होत आहे. त्यांच्या नसण्याने पोरकेपणा आलेला आहे. नाणीने आताच सांगितले आहे की,एखादया मुलीची आई नसेल तर काय परिस्थिती असते. अर्चनाताईच्या आतम्यास शांती मिळो आणि बारणे कुटूंबियांना दु:ख सहन करण्याची शक्ती देवो अशी प्रार्थना करते. अर्चनाताईस मी माझ्या नागरगोजे कुटूंबाच्या आणि पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज खरोखर दु:खव्यक्त करताना माझी सहकारी,माझी मैत्रिण अर्चनाताई बारणे यांना माझ्या कुटूंबातर्फे भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. त्याचबरोबर आमचे सहकारी नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांच्या मातोश्री यांचेही दु:खद निधन झालेले आहे त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करते. अर्चना ही त्यांच्या वॉर्डामध्ये खुप चांगल्या प्रकारे काम करीत होती. माई, अशी व्यक्ती आपल्यातुन निघुन जाते त्यांच्या जाण्याने त्यांच्या कुटूंबियांना फार मोठा धक्का बसलेला आहे. तो धक्का सहन करण्याची शक्ती त्यांना देवो अशी मी बप्पा जवळ प्रार्थना करते. बप्पांना मी प्रार्थना करते की,अर्चनाच्या ज्या काही अपेक्षा होत्या,आशा आकांक्षा होत्या त्या पुर्ण करण्याचं काम त्यांच्या परवाराला देवो आणि परमेश्वर तिच्या आत्म्याला शांती देवो मी माझ्या पालांडे कुटूंबियांकडुन आणि प्रभागाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

मा.महापौर – ज्यांना बोलावयाचे आहे त्यांच्या शेजा-यांचा मोबाईल फोन बंद करणेत यावा.

मा.आशा धायगुडे-शेंडगे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, ख-या अर्थानं आज आमची एक मैत्रिण अर्चनाताई बारणे, ही आपल्या सर्वांना सोडून गेली.खरंतर एखादा नगरसेवक सोडून जाणं ही त्या प्रभागातील जरी पोकळी असली तरी ती कोणाची तरी आई,कोणाची तरी मुलगी,कोणाची तरी बहीण,कोणाची पत्नी अशा सगळयांच्या आयुष्यामध्ये जी पोकळी आहे ती भरुन निघणं इतकं सोपं नाही. याठिकाणी मी अर्चनास माझ्या कुटूंबाच्या वतीने आणि प्रभागाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. खरंतर माई,मला याठिकाणी असं वाटतं की, आजची जी सभा होती ती तहकुब करणार असली तरी ही सभा या सभागृहात घेणं गरजेचं होतं कारण ती आपल्यातीलच एक सहकारी होती. तिने अनेक वर्ष हे सभागृह पाहिलं असेल, आज आपण या सभागृहातले चार नगरसेवक गमावलेले आहेत. हा दुर्देवी प्रसंग

या शहरावर देखील आहे. अशा वेळेला त्यांच्याबद्दल आपल्या मनामध्ये असलेल्या भावना,प्रेम आदर व्यक्त करण्यासाठी ही सभा सभागृहातच घेणं गरजेचं होतं. असं मला याठिकाणी खेदाने सांगावसं वाटतयं. परंतु पुन्हा एकदा अर्चनाताई यांना माझ्या कुटूंबाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करते आणि थांबते.

मा. कमल घोलप - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज आपल्यातुन अर्चनाताई बारणे गेल्या आहेत. बारणे कुटूंबावर दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे. त्यांना दु:खसहनकरण्याचीशक्तीदेवोअशीमीपरमेश्वराजवळ प्रार्थना करते.आणि अर्चनाताईस मी माझ्या कुटूंबियातर्फे आणि प्रभागाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

मा. शर्मीला बाबर -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज आपल्यामध्ये अर्चनाताई नाहीत. त्यांना माझ्या कुटूंबाच्या वतीने आणि प्रभागाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. अर्चनाताई खुप मनमिळाऊ आणि एकदम साध्या होत्या. तिने कधीही रागावुन कधीच बोलली नाही. आणि ती सगळयांची चौकशी करणार अशा या प्रेमळ अर्चनाचे दु:खद निधन झालेलं आहे. आणि बारणे कुटूंबावर दु:खाचाडोंगरकोसळलेलाआहे.या दु:खातुनसावरण्याचीशक्तीपरमेश्वराने त्यांना देवो अशी मी प्रार्थना करते.

मा.बाबु नायर - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह अर्चनाताई बारणे या आपल्यातुन निघुन गेलेल्या आहेत. हा दु:खाचा डोंगर त्यांच्या कुटूंबावरच नाहीतर संपुर्ण शहरावर आलेला आहे. या सभागृहातील चार नगरसेवक आपण या कोविडमुळे गमावलेले आहेत. आणि त्यानिमित्ताने अर्चनाताई बारणे यांना भावपुर्ण श्रध्दांजली देत असताना आपले पक्षनेते नामदेव ढाके यांना पण बोलू इच्छितो की, आपण कुठपर्यंत ही जोखीम उचलायला पाहिजे हा पण महत्वाचा भाग आहे. माई, मी आपल्याला फोन केला तेंव्हा आपण स्वत: कोविड हॉस्पिटल मध्ये होता. आपणही आपल्या तब्ब्येती कडे लक्ष दिले पाहिजे. कारण आपण १३३ नगरसेवकांपैकी चार नगरसेवक आपले गेलेले आहेत. तसेच आपले सहकारी नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांच्या मातोश्री यांचेही निधन झालेलं आहे तसेच माजी नगरसेवक तानाजी खाडे यांच्या पुतण्याचेही दु:खद निधन झालेले आहे त्यांना मी माझ्या नायर कुटूंबाच्या वतीने आणि भारतीय जनता पार्टीच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.अभिषेक बारणे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह माई, आजख-या अर्थाने आपले सर्व ज्येष्ठ नगरसेवक अर्चनाताई बारणे यांना श्रध्दांजली वाहत आहेत. बारणे कुटूंबातीलच एक सदस्य गेलेला आहे. त्यांना जर ख-या अर्थानं श्रध्दांजली अर्पण होईल त्यांच्या आत्म्याला शांती भेटल त्या ज्या गेलेल्या आहेत त्याच कारण अजुन स्पष्ट झालेलं नाही. आज आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी म्हणतात की, त्यांना डेंग्यु नव्हताच आणि बाहेरच्या लॅबचा रिपोर्ट होता की, त्यांना डेंग्यु होता. त्यानंतर त्यांना ज्युपिटर हॉस्पिटलला ज्यावेळेस अँडमिट केलं अँडमिट केल्यानंतर त्या संध्याकाळी ७ वाजेपर्यंत बोलत होत्या त्यावेळेस डॉक्टरनी सांगितलं की, त्यांना प्लाझमाची गरज आहे. त्यावेळेस त्यांना प्लाझमा दिला. त्यानंतर त्यांचा रक्तगट आहे ए पॉझिटीव्ह आणि त्यांना बी निगेटीव्हचा रक्त डॉक्टरांनी दिलं. आणि आता आम्ही त्यांची संपुर्ण फाईल आणली आणि याची चौकशी केली असता यावरुन माई, असं दिसतय की, या गोष्टीमुळं ही घटना घडलेली आहे. ज्युपिटर हॉस्पिटलचे सगळे रिपोर्ट याठिकाणी आणलेले आहेत. तर माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, एक तासापुर्वी बोलणा-या पेशंटला एक तासानंतर डायरेक्ट व्हेंटीलेटरची गरज पडली आहे. माई,मी तुम्हांला विनंती करतो की, तुम्ही वैदयकीय अधिका-यांना बोलवून हे खरं काय आणि खोटं काय आहे याची शहानिशा करा, आयुक्त साहेबांना पण विनंती आहे की, या ज्या गेलेल्या आहेत त्या डेंग्युनी गेल्या आहेत का, नाही याची चौकशी करावी. आपण म्हणतो डेंग्युनी गेले नाहीत आणि बाहेरच्या लॅबचे रिपोर्ट आहेत की, डेंग्युनी गेल्या आहेत. त्यानंतर ज्युपिटर हॉस्पिटलनी ए पॉझीटीव्ह रक्तगट असताना बी निगेटीव्ह रक्त दिलेलं आहे. आणि एक तासानंतर पेशंट लगेच गेल्याचं आम्हांला कळवलं आहे. माझी सर्वांना विनंती आहे की, आपण सर्वांनी याच्यावरती आवाज उठवून याच्यावरती काही तरी केलं पाहिजे नाही तर अशीच घटना सर्वसामान्य नागरीकांच्या बद्दल झाली तर काय करायचं. म्हणुन माझी आपल्या सगळयांना विनंती आहे की, फक्त आज श्रध्दांजली वाहुन त्यांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही. आमच्या कुटूंबाला जो त्रास झाला आहे त्याच्यामधुन जर काही मार्ग काढला तरच त्यातुन त्यांना न्याय मिळणार आहे.आणि त्यांना ख-या अर्थाने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण केल्यासारखं होणार आहे.

मा.एकनाथ पवार - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर एवढया लवकर अर्चनाताईला श्रध्दांजली वाहण्याची वेळ येईल असं वाटत नव्हतं. हे खरंतर आपलं दुर्भाग्य आहे. आज आपला ४/५ वर्षाचा काळ संपत आलेला आहे. सहा महिन्यानी आपल्या निवडणुका येत आहेत. ज्यावेळेस आपण सर्वजण सभागृहामध्ये येतो त्यावेळेस आपली अपेक्षा

असते की,शेवटच्या दिवसापर्यंत आपण सर्वांनी एकत्रित असलं पाहिजे. परंतु या सभागृहाचं खरंतर दुर्भाग्य आहे की,दत्ता काका असतील,जावेदभाई असतील,उंडे असतील, अर्चनाताई असेल या सर्वांनी आपल्याला सोडून गेले आहेत. आता आपण सांगितले की,अर्चनाताईच्या मृत्युचं कारण सांगितलं जात आहे की,डेंग्युमुळ झाला आहे, कोण म्हणतं डेंग्युमुळे झाल नाही. खरंतर मा.महापौर मी आपल्याला विनंती करतो की, अर्चनाताई या आपल्यातुन अशा पध्दतीने निघुन जातील असं वाटलं नव्हतं. अचानक अशी घटना घडते हे आपल्या सर्वांच दुर्देव आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची परिस्थिती पाहिली तर, महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांना चांगल हॉस्पिटल मिळेल,वैदयकीय सुविधा मिळाल्या पाहिजेत. अशा पध्दतीने आपण इंश्युरंन्स मिळाला पाहिजे. या कुटूंबाची ही सगळी परिस्थिती पाहता रिपोर्टस चुकीचे आहेत, ट्रिटमेंट कशा पध्दतीने दिली, त्याच्या काय प्रॉब्लेम आहेत,काय अडचणी आहेत खरंतर ज्युपिटर हे एक चांगल हॉस्पिटल आहे. त्याच्या आगोदरचे रिपोर्ट बरोबर होते का,नव्हते याची चौकशी होणं गरजेचं आहे. मा.महापौर साहेब,आपण श्रध्दांजली वाहत असताना मी आपल्याला विनंती करतो की,अर्चनाताईचं निधन हे कुठल्या कारणामुळे झालेलं आहे. याची चौकशी होणं गरजेचं आहे. आज बारणे कुटूंबावरती जो आघात झालेला आहे. खरंतर अर्चनाताईचं वय हे आपल्याला सोडून जाण्यासारखं नव्हतं परंतु बारणे कुटूंबावरती जो आघात झालेला आहे त्यातुन सावरण्याची शक्ती परमेश्वर त्यांना देवो. बाबु नायर सांगत होते की, आपण सार्वजनिक जीवन जगत असताना आपणही आपल्या आयुष्याची काळजी घेतली पाहिजे. आणि आपल्या सर्वांच्या वतीने आणि या सभागृहाच्या वतीने अर्चनाताईस भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

मा.राहुल जाधव - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर आजची जनरल बॉडी ही अतिशय भावुक वातावरणामध्ये याठिकाणी पार पडत असताना आमच्या सर्व नगरसेवकांची भगिनी आणि नगरसेविकांची मैत्रिण अर्चनाताईला याठिकाणी श्रध्दांजली वाहत असताना मन अतिशय जड होत आहे. खरंतर २०१७ च्या निवडणुका झाल्यानंतर आपल्या महापालिकेचे १२८ नगरसेवक निवडुन आले. आणि स्विकृत ५ नगरसेवक असे १३३ नगरसेवक झाले. परंतु दुर्देवाने या चार सव्वाचार वर्षाच्या कालखंडामध्ये कोरोनासारख्या महामारीमध्ये आपले चार नगरसेवक गमावलेले आहेत. त्यामध्ये आमचे ज्येष्ठ नगरसेवक दत्ता काका,जावेदभाई,लक्ष्मण उंडे काका आणि आता अर्चनाताई असतील. ख-या अर्थानी आता अभिषेकनी जो खुलासा केला आहे. त्यामध्ये डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे जर या अर्चनाताईचा मृत्यु झालेला असेल तर हे दुर्देव आहे. आणि लोकप्रतिनिधीच्या बाबतीत जर असं काही घडत

असेल तर सर्वसामान्याच्या बाबतीत काय घडत असेल, हा विचार मनामध्ये येतो. खरंतर अर्चनाताई आपल्याला सोडून गेल्या आहेत यावर विश्वासच बसत नाही. अर्चनाताईयानिर्मळस्वभावाच्या होत्या त्यांचे पती तानाजी बारणे व संपुर्ण परिवार हे प्रभागामध्ये काम करणे,समाजाची सेवा करणे, आणि समाजाची सेवा केल्याशिवाय तुम्हाला कोणी निवडुन देत नाही. जो समाजाची सेवा करतो त्याच्या पाठीमागे मतदार किंवा समाज भक्कमपणे उभा रहातो. आणि हे सर्व करण्यासाठी आपण रात्रंदिवस कष्ट करतो,मेहनत करतो,आपण पदरमोड देखील करतो. आपण आपल्या परिवाराकडे लक्षं देत नाही एवढंच नाही तर आपण आपल्या तब्ब्येतीकडे सुध्दा लक्ष देत नाही. नगरसेवक या नावासाठी आपणही आपल्या तब्ब्येतीकडे दुर्लक्ष करु नये. परंतु ज्यावेळेस आपण आपल्या प्रभागामध्ये कारभारी म्हणुन नेतृत्व करतो आणि घरातील कारभारीच गेल्यानंतर परिवाराची किती वाताहत होती. हे माझ्यासारख्यांनी सांगण्याची गरज नाही. परंतु हे करत असताना प्रत्येक व्यक्ती आपल्या घरातील रोज सकाळी आपण घर सोडताना देखील आपल्याला काळजी घ्या म्हणत असतात. आणि या सगळया गोष्टीकडे आपण दुर्लक्ष करुन आपण या समाजसेवेसाठी वाहून घेत असतो. आणि शंभर टक्के या समाजासाठी या गोष्टी केल्या पाहिजेत. आणि मा.महापौरांना मी विनंती करतो की,अभिषेकनी जो खुलासा केलेला आहे. याच्यासाठी आपण वैदयकीय विभागाची जरी कमिटी नेमली तरी चालेल परंतु दूध का दूध आणि पाणी का पाणी हे झालचं पाहिजे. तरच ख या अर्थाने अर्चनाताईला श्रध्दांजली अर्पण केल्यासारखे होईल. याचं कारण असे आहे की,अर्चनाताईनी या पिं परी चिंचवड शहरासाठी भविष्यामध्ये खुप काही केलं असतं. असा दूरदृष्टीकोन असलेला बारणे परिवार आहे. त्यामुळे माईंना मी विनंती करतो की, वैदयकीय विभागाची समिती नेमल्यानंतर त्याची सखोल चौकशी व्हावी आणि ए पॉझीटीव्ह रक्त गट असताना त्याठिकाणी बी निगेटीव्ह रक्ताचा प्लाझमा दिला कसा तर अभिषेकनी पुर्ण फाईल आणलेली आहे. त्यामुळे या विषयाची पुर्णपणे शहानिशा ही झालीच पाहिजे. कारण एवढं मोठं ज्युपिटर हॉस्पिटल याठिकाणी किती मोठया अपेक्षेने लोकं त्याठिकाणी जातात. कोरोनाच्या महामारीमध्ये एवढया मोठया हॉस्पिटलमध्ये सर्वात मोठं हॉस्पिटल हे ज्युपिटर हॉस्पिटल आहे आणि त्यामध्ये अशा काही घटना घडतात हे अतिशय दुर्देवी आहे. त्यामुळे मी विनंती करतो की,याची वैदयकीय विभागामार्फत याची चौकशी करावी.त्याच बरोबर अर्चनाताईच्या जाण्याने बारणे कुटूंबावर जे दु:ख झालेलं आहे ते सहन करण्याची ताकद परमेश्वराने देवो. आणि अर्चनाताईच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो. आणि आपल्या सर्वांच्या वतीने ताईंना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.सिमा सावळे -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज अर्चनाताई बारणे आपल्यातुन निघुन गेलेल्या आहेत. खरंतर त्या निघुन गेल्या आहेत का,त्यांना जायला भाग पाडलं हा एक अत्यंत संशोधनाचा विषय आहे. मुळात आपल्यातुन आपले सहकारी निघुन गेले. त्यासाठी आपण सभागृहात बसुन आजची श्रध्दांजलीची सभा घेणं अपेक्षित होतं. कुठले कायदे आहेत, कुठले नियम आहेत मला माहिती नाही. परवा आपण जिल्हा नियोजन समितीला उपस्थित होता तिथे अजितदादांच्या मिटींगला तीनशे लोकं होती. त्याठिकाणी कोविड नव्हता. आणि नेमकं महानगरपालिकेच्या सभेला कोविडचे कारण सांगुन आणि गेली चार साडेचार वर्ष तुमच्या आमच्या खांदयाला खांदा लावुन काम करणारी भगिनी आमच्यातुन अचानकपणे निघुन जाते. आणि आपण आपल्या जागेवरती बसुन श्रध्दांजली वाहतो त्याबध्दल तुमचा आणि प्रशासनाचा कडक शब्दात निषेध व्यक्त करते. मा.महापौर साहेब, ती भगिनी आपल्या बरोबरची आहे. त्यांना आपण सभागृहात बसुन पाच मिनिट श्रध्दांजली वाहु शकत नाही इतका मोठा कायदा आहे का, कायदा हा माणसांसाठी असला पाहिजे. माणसे कायदयासाठी नसतात त्याचा आपल्याला पण विसर पडलेला आहे. आणि दुर्देवानी भारतीय जनता पार्टीची नगरसेविका होती. त्यांच्याबद्दल कुणालाच सहानुभूती नाही. सगळं खोटं प्रेम आणि आवसान आणुन तुम्ही सभा चालवताय. ती व्यक्ती आपल्यातुन निघुन गेली आहे. एखादया राजकीय कार्यकर्त्याची शेवटची इच्छा काय असते. त्याच्या मुलाच्या लग्नाला लोकं जास्त यावे किंवा मृत्युला लोकं जास्त यावीत. एवढयासाठी लोकं मरमर काम करतातनां, त्याबद्दल मला प्रचंड संताप झालेला आहे. दुसरं महापालिकेच्या वायसीएमएचचे जे कोणी डॉक्टर ऑनलाईन उपस्थित असतील, कमिशनर असतील त्यांना विचारा आपल्या भागात चालू असणा-या ज्या काही लॅब आहेत त्यामध्ये अंकुर हॉस्पिटलने चिंचवडच्या सातव लॅबला अर्चनाताई बारणे यांचे सॅम्पल दिले होते. ते सॅम्पल डेंग्यु पॉझिटीव्ह म्हणुन आले. आणि महानगरपालिका १५ तारखेला रिपोर्ट देते की अर्चनाताईला डेंग्यु झाला नव्हता. असं कसं शक्य आहे. त्यांना डेंग्यु झाला म्हणुन ज्युपिटर हॉस्पिटलला अँडमिट केलं. डेंग्युच्याच उपचार पध्दती अर्चनाताई बारणेवर चालू होत्या. ए पॉझिटीव्ह ब्लड ग्रुप असताना बी निगेटीव्ह ब्लड त्यांना देण्यात आलं. या सर्व विषयावर सभागृहात चर्चा व्हायला पाहिजे होती. आपल्यातील एक सहकारी कायमचा निघुन गेला आहे. ती बिच्चारी न्यायासाठी कुणालाही हाक मारु शकत नाही नां, पण अजुनही अर्चनाताई बारणे या शहरात आहेत त्यांच दुर्देवी निधन होऊ नयेत म्हणुन काळजी करणं, काळजी घेणं हे आपलं कर्तव्य आहे. या शहराचे महापौर म्हणुन किंवा सत्ताधारी पक्ष म्हणुन आपलं काम आहे. लोकांनी निर्भयपणे जगलं पाहिजे. किमान माणुस

गेल्यानंतर तरी त्याची शोकसभा ही चांगली झाली पाहिजे. सन्मानीत झाली पाहिजे. आता आम्ही या कोप-यात, तुम्ही त्या कोप-यात अशा परिस्थितीत आपण श्रध्दांजली वाहतोय. या सभागृहाची गरीमाच निघुन गेलेली आहे. आणि म्हणुन असा संताप झालेला आहे की, तो सांगुच शकत नाही. एकीकडे मोठया सभा चालतात, राज्याचं अधिवेशन चालतं, अनेक आंदोलने चालू शकतात आणि फक्त आणि फक्त महापालिकेची महासभा आणि स्टँडींगची सभा एवढयाच चालू शकत नाहीत. कमिशनरांना भेटण्यासाठी लोकांच्या रांगा लागु शकतात, आज लग्नामध्ये जाउन बघा तुम्ही काय परिस्थिती आहे. कोविड आहे, काळजी घेतली पाहिजे, माणसं जगवली पाहिजे. यावर चर्चा व्हायला पाहिजे. कोण माणसं जगतात, कोण मरतात याच्यावर चर्चा व्हायला पाहिजे. पण कुठल्याच मुद्यांवर चर्चाच करायची नाही या मुद्यांवर सभागृह येऊन थांबत असेल तर मा.महापौर साहेब, अशा अनेक अर्चनांचे बळी याठिकाणी जातील. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की, वायसीएमएचला विचारा १५ तारखेला अर्चनाताईला त्याठिकाणी डेंग्यु झालेला नव्हता, असा वायसीएमएचने रिपोर्ट दिलेला आहे. आणि समजा, वायसीएमएच बरोबर आहे तर आपण ज्युपिटर हॉस्पिटलवर कारवाई करणार का? अंकुर हॉस्पिटलवर कारवाई करणार का? सातव लॅबवर कारवाई करणार का? एक काही तरी निर्णय घ्यावा लागणार आहे नां, एक जीव गेला आहे मा.महापौर साहेब, एक कुटूंब उघडयावरती आलं आहे. त्या कुटूंबाच्या वरती अवलंबुन असणारी सगळी नाती उघडयावर आलेली आहेत. त्यांची मुलं-बाळं उघडयावरती आलेली आहेत. मगाशी मा.उपमहापौरांनी खुप चांगली मतं मांडलेली आहेत. दु:ख, वेदना काही तरी होत असेल नां २०२१ चा नियम दाखवून सभागृहापासून प्रशासन जर त्याठिकाणी आडकाठी आणत असेल तर मा.आयुक्तांना विनंती आहे की, आयुक्त साहेब, आम्हांला तुमच्या विरोधात पोलिसात कम्पलेन दाखल करावी लागेल की, तुम्ही सुध्दा कोविडच्या काळामध्ये जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला तिथे अडीचशे ते तीनशे लोकं उपस्थित असताना आपण त्या बैठकीला उपस्थित होतात. आणि आपण एक जबाबदार आयएएस ऑफिसर म्हणुन त्याठिकाणी आपण मा.उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणुन दिलं नाही. कोविडचा काळ आहे आणि याठिकाणी गर्दी करुन चालणार नाही. आणि तो नियम इथे लागु आहे तर तो तिथे का लागु नाही. याचा सुध्दा आपण विचार करावा. त्या मिटींगला मी होते, महापौर होते, आरती चोंधे ताई होत्या, कमिशनर साहेब होते, पोलिस कमिशनर साहेब होते, राज्याचे मा.उपमुख्यमंत्री होते, वळसे पाटील साहेब होते सगळेच होते. या सगळयांनी कायद्याचं उल्लंघन केलं असेल तर माझ्यासकट सगळयांवर गुन्हे दाखल केले

पाहिजेत. केवळ आपण पळवाट काढायची एवढंच धोरण असेल आणि फक्त लोकांना दाखवण्यासाठी आपण श्रध्दांजली वाहतो की काय असं वाटायला लागलं. माझ्या सहकारी भगिनीच्या दु:खात मी सहभागी होऊ शकत नाही. त्यांच्या घरच्यांना जर आम्ही धिर आणि दिलासा देवु शकत नसेल तर मी स्वत:ला नगरसेवक म्हणुन घेणं फोल आहेत, भंपकबाजी आहे. आणि अशा भंपकबाजीला मी अजिबात बळी पडणार नाही. हे जे काही चाललं आहे ते त्वरीत थांबवाव आणि अर्चनाताई बारणेसाठी आपल्याला न्यायालयीन लढा उभारावा लागला तरी चालेल. मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करते की, डॉ.रॉय असतील, डॉ.साळवे असतील, डॉ.वाबळे हे त्यांचे वडील वारल्यामुळे सुट्टीवर गेलेले आहेत. जे कोणी असतील त्यांना लाईनवरती घ्या. वायसीएमएच नी १५ तारखेला रिपोर्ट दिला आहे की अर्चनाताईंना डेंग्यु झाला नव्हता म्हणुन रिपोर्ट दिला आहे. असं असेल तर त्यांच्यावर चुकीचे उपचार केले गेले आहेत का? आणि मग त्यांची मान्यता आपण रद्य करणार आहोत का? त्याठिकाणी आपलं वैदयकीय पथक जाणार आहे का? असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. (नेटवर्क येत नव्हते.) हे सगळे प्रश्न अर्धवट ठेवुन अर्चना निघुन गेलेली आहे. आज याठिकाणी पक्षनेत्यांच्या कार्यालयामध्ये अर्चनाताईचे पती तानाजी बारणे आणि त्यांचे सर्व नातेवाईक येऊन बसलेले आहेत. अर्चनाताईंच्या पतीचा चेहरा बघितला तर तुम्ही सुध्दा बघु शकत नाही. त्यांच्याकडे पाहिलं की,आपले सुध्दा डोळे भरुन येतात. आज अशा परिस्थितीमध्ये २०/२२ वर्ष संसार केल्यानंतर अर्धांगिंनी सोडून जाते. का, त्यांना सोडून जायला भाग पाडलं जातं या सगळया गोष्टींचा ऊहापोह होणं आणि त्यांना न्याय मिळणं गरजेचं आहे. आणि म्हणुन मा.महापौर साहेब,तुम्हांला हात जोडून विनंती आहे हो, माणसं मरतात त्यावेळेस तरी आपण काही वेळेसाठी नियम बाजुला ठेवत चला. आपण हे नियम कोणासाठी करतोय, तीन साडेतीन हजार लोक आपल्या हॉस्पिटलमध्ये होते त्यातील काही लोक एक्सपायर होत होते, त्यावेळेस सुध्दा आपण मिटींगा घेत होतो. आज आपण नाही घेतली, हे दुर्देव आहे. हे या सभागृहाचंच दुर्देव आहे. ज्यावेळेस माणुस मरतो नां,त्यावेळेस तो देव होतो. आणि देव तर सगळयांना क्षमा करतो.पण ती बिच्चारी वरुन पहात असेल नां, ती तुम्हांला,आम्हांला सगळयांना क्षमा करील आपण एका आरशात बघा आपण स्वत:ला माफ करु शकणार आहोत का? धन्यवाद.

मा.चंदा लोखंडे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज आपल्या सहकारी नगरसेविका अर्चनाताई आपल्यातुन निघुन गेलेल्या आहेत त्यांना माझ्या परिवाराच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहते.

मा.राहुल कलाटे - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज याठिकाणी अर्चनाताई तानाजी बारणे यांना श्रध्दांजली वाहतोय पण खरंतर आपल्यातील एक मित्तभाषी सहकारी गेलेल्या आहेत आणि तानाजीरावांना त्यांच दु:ख त्यांनी सावरायलाच हवं कारण त्यांच्या कुटूंबाची जबाबदारी देखील त्यांच्यावर आहे. स्वत:च्या कामाशी एकरुप असणा-या आपल्या भगिनी यांच दु:खद निधन झालं आहे त्यांना माझ्या कुटूंबाच्या वतीने आणि शिवसेनेच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो. तसेच आपले ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर यांच्या मातोश्री इंदुताई भोईर यांचेही निधन झालं आहे त्यांना देखील श्रध्दांजली वाहतो. परंतु ही श्रध्दांजली वाहत असताना आपण सर्वांनी विचार करायला हवा की,आपल्यातील हा चौथा सहकारी निघुन गेलेला आहे. यातले दोन सहकारी कोरोनाने गेले आहेत आणि आज अर्चनाताई या डेंग्यु सारख्या आजारानी गेलेल्या आहेत. आता अभिषेकनी सांगितलं की, तो आजार झाल्यानंतर त्याच्याकडे पाहिलं पाहिजे. यामध्ये आपल्या महापालिकेच्या अधिका-यांनी घाई का केली आहे याचा देखील सर्वांनी विचार करायला पाहिजे. कारण आज मी ज्युपिटर हॉस्पिटलच्या डॉक्टरांशी बोललो आहे त्यांनी देखील सांगितले आहे की,त्यांचे सगळे रिपोर्ट हे पॉझिटीव्ह आलेले आहेत. असं असताना डॉ.साळवी सरांनी का सांगितलं आहे की, त्यांचा मृत्यु हा डेंग्युनी झालेला नाही. अर्चनाताईला त्रास सुरु झाल्यानंतर त्यांना थेरगावच्या हॉस्पिटलमध्ये ठेवलं त्यानंतर त्यांना ज्युपिटरला शिफ्ट केलं. ज्युपिटरला त्यांना शिफ्ट केल्यानंतर त्यांच्या कुटूंबावर आणि सर्वांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. खरंतर या दु:खातुन सावरण्याची शक्ती परमेश्वर त्यांना देईलच. आता सिमाताईंनी सांगितलं आहे की, त्यांच्या घरातले सगळे येऊन बसलेले आहेत आपण त्यांचा देखील विचारकेला पाहिजे की,आपल्यातील एक सहकारी जात असताना अशा प्रकारची कॉम्पलीकेटली का होते. आणि त्या डेंग्यु सारख्या आजाराने जात असतील तर आपल्या आरोग्य खात्यावर देखील प्रश्नचिंन्ह उभा रहातो. पुर्वी आपण जागोजागी फवारणी करा,स्वच्छता करावी असे सांगत होतो आणि आपण आपली काळजी घेतो. महापालिकेच्या वैदयकीय विभागाचं म्हणणं आहे की,त्यांचा मृत्यु डेंग्युने झालेला नाही आणि ज्युपिटर हॉस्पिटलचं म्हणणं आहे डेंग्यु झालेला होता. तर माई,आपण याच्यामध्ये सर्वानी लक्षं दिलं पाहिजे. ज्यांच्या घरातील व्यक्ती जाते त्यांना आपण दोन मिनिटे श्रध्दांजली वाहून विसरुन जाऊ पण आज त्यांच्या घरामध्ये दोन लहान,लहान मुले आहेत. अर्चनाताई या अतिशय मितभाषी होत्या लोकांची कामे करताना त्यांना देवाज्ञा झालेली आहे. माई,सिमाताईंनी सांगितले आहे की,उपमुख्यमंत्र्यांच्या मिटींगमध्ये सर्वजण होते. परंतु माझी नामदेवरावांना विनंती आहे की, आम्ही आजही गटनेते कार्यरत आहोत मला वाटतं आमचा आपल्याला विसर पडलेला दिसतआहे. आपल्याला असं वाटत असेल की, विरोधी पक्षाला फोन केला की, संपल पण आता ही राजकारण करण्याची वेळ नाही. परंतु कुठलाही असा निर्णय घेत असताना आपण पॉझिटीव्ह राहीलातर चांगल राहील कारण की आता सहा महीन्यावर इलेक्शन आलेल आहे. सर्वांनाच आपआपल्या प्रभागात काम करायची आहेत त्यामुळ जास्त राजकारण न करता मी याठिकाणी श्रध्दांजली वाहून थांबतो. परंतु माईना माझी देखील विनंती आहे की अर्चनाताईंच्या झालेल्या दुर्दैवी घटनेत आपण लक्ष घालाव आपण प्रशासनाला तशा सुचना दयाव्यात आणि पुढील जीबी घेताना आपण सर्व पक्षाचा विचार करावा.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह. आज आपल्या सभागृहातील सहकारी नगरसेवीका यांच्यावरती जवळपास पंचवीस तीस नगरसेवकांनी याठिकाणी श्रध्दांजली अर्पण केली. ब-याच जणांनी सांगीतल की कोरानामुळे आपले तीन सहकारी गमवावे लागलेले आहेत. आपण स्वत: स्मार्टसिटीला उपस्थित असताना अर्चनाताईची वार्ता कळाली. आपला विश्वास बसत नव्हता तातडीने आपण त्यांच्या घरी गेलो त्यावेळेला आपल्याला त्याठिकाणी परिस्थिती लक्षात आली. ही अतीशय चटका लावणारी घटना आपल्या सभागृहासाठी आहे. अर्चनाताईच जाण्याच वय नव्हत, अर्चनाताईबद्दल ब-याच जणांनी सांगीतल की लोकप्रतिनीधी म्हणून त्यांनी ब-याच उपाययोजना केल्या, त्या प्रभागातील कामासाठी ब-याचवेळा सभागृहात भांडल्या. अर्चनाताईचा चार दिवसाचा कालावधी झाला आणि अचानक निरोप आला असं असं झाल म्हणून ही घटना सभागृहाला हुरहूर लावणारी आहे. याठिकाणी ब-याच नगरसदस्यांनी भूमीका मांडलेली आहे. मा.महापौर साहेब, लोकप्रतीनीधी म्हणून आपण आपल्या स्वत:कडे कळत-नकळत थोडस दुर्लक्ष करतो अशा अनेकप्रकारच्या गोष्टी सुध्दा आपल्या लक्षात आलेल्या आहेत. परंतु जनतेसाठी आपण काम करत असल्यामुळे अर्चनाताईनी त्याठिकाणी काम केल. परंतु मृत्यूच कारण घोषीत केल, ज्युपीटर हॉस्पिटल मध्ये नेल, त्याठिकाणी काय काय ट्रिटमेंट केली ते आता अभिषेक बारणे यांनी सांगीतल. खर म्हणजे त्यांचा ब्लडग्रूप जर ए-पॉझिटीव्ह होता आणि त्यांना बी-निगेटीव्ह कशा पध्दतीने ठरवल गेलं म्हणजे त्यांच्या ब्लडग्रूप वरती ज्युपीटर हॉस्पिटलच्या माध्यमातून चुकीच्या पध्दतीची वैदयकीय सेवा पुरवली गेली असं मला याठिकाणी वाटतं. त्यांच्या मृत्युच कारण त्या ज्युपीटर हॉस्पिटल कडून किंवा संबंधिताकडून येण अपेक्षीत नसताना एका अर्थान अर्चनाताईच या ज्यूपीटर हॉस्पिटलकडे चांगल्या पध्दतीचे डॉक्टर असताना अशाप्रकारे कसे झाले. त्यांच्या मृत्यूच कारण या सभागृहाच्या समोर आल पाहीजे. सातव लॅब असेल तेथे त्यांच्या मृत्यूच निदान केल असताना मग ज्यूपीटर हॉस्पिटलनी माञ त्याठिकाणी ब्लडग्रूप त्यांचा ए-पॉझिटीव्ह असताना बी-निगेटीव्ह कशा पध्दतीने दिला. अशा गोष्टी ख-या अर्थाने सभागृहाच्या समोर आल्या पाहीजेत. पिंपरी चिंचवड शहरातील आमच्या सर्व सदस्यांना आणि त्यांच्या कुटूंबीयाना त्यांच्या नातेवाईकाना नेमक मृत्यूच कारण वैदयकीय रित्या काय आहे याबाबतीत खुलासा झाला गेला पाहीजे. याठिकाणी त्याची पुर्णपणे चौकशी झाली पाहीजे. नेमकी त्यांना जी पहील्यापासून ट्रिटमेंट दिलेली आहे मग ते थेरगावच हॉस्पिटल असेल किंवा ज्युपिटर हॉस्पिटल असेल त्याची पुर्णपणे तपासणी एका समितीमार्फत करणं गरजेच आहे. परंतु ज्युपिटर हॉस्पिटलच्या माध्यमातून चुकीची ट्रिटमेंट जर दिली असेलतर त्यांच्यावरती कडक

कारवाई केली गेली पाहीजे आणि जबाबदार दोषी डॉक्टरावरती कारवाई झाली पाहीजे. मृत्यूच वैदयकीय कारण जे आहे ते डॉक्टर याठिकाणी देवू शकतील त्याच्या संदर्भामधे खुलासा याठिकाणी करावा. ज्युपीटर हॉस्पिटलचा अहवाल आलेला असेलतर त्या संदर्भामध्ये खुलासा डॉक्टरांकडून घ्यावा आणि आमच्या अर्चनाताईवरती चुकीच्या पध्दतीने ज्यांनी इलाज केला आहे त्यांच्या मृत्यूला जे जबाबदार आहेत त्यांच्या वरती कडक कारवाई झाली पाहीजे अशाप्रकारची भूमीका मी याठिकाणी मांडतो. मा.आयुक्ताना यासंदर्भात खुलासा मिळालेला असेलतर आयुक्ताना किंवा डॉक्टरांना त्यासंदर्भात नेमक वैदयकीय कारण काय आहे हे सभागृहाला सांगाव. हा खुलासा झाल्यानंतर मगाशी केशवरावानी ही सभा २९/७/२०२१ दुपारी २.०० पर्यंत तहकूब करण्यासाठी आपल्याला विनंती केलेली आहे.

मा.महापौर - डॉ.साळवे आपण खुलासा करावा.

डॉ.साळवे (अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.अर्चनाताई बारणे यांच्यावर नंतर ज्युपीटर हॉस्पिटलला उपचार चालू होते. जेव्हा त्यांच निधन झाल तेव्हा जे सँपल आहे ते वायसीएमला शासनमान्य लॅबमार्फत तपासल त्याच्यामध्ये आयसीएम निगेटीव्ह आलेल आहे त्या रिपार्टच्या आधारावर आपण खुलासा सादर केला होता की त्यांच्या रक्ताचा रिपोर्ट निगेटीव्ह आहे. शासनाच्या लेव्हलवर याच्यावर चर्चा झालेली आहे की याच ऑडीट होत. आपण आपल्या वायसीएमच्या लॅबमध्ये ते सँपल तपासल आहे त्याच्यामध्ये निगेटीव्ह आहे याचा अर्थ सँपल निगेटीव्ह आहे आणि त्याच्यामध्ये डेंग्युचा दोष आढलेला नाही.

मा.महापौर - तो जो रिपोर्ट ज्युपीटरनी दिलेला आहे की डेंग्यूमुळ झालेला आहे म्हणून तर आपण त्यांच्यावर काय कारवाई करणार आहोत. त्यांनी असा रिपोर्ट दिला आहे की डेंग्यूमुळ मयत झाली तर मग आपण त्यांच्यावर काय करणार आहेत.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह. त्यांचा ए-पॉझीटीव्ह ब्लडग्रूप होता आणि त्यांनी बी-निगेटीव्हने त्याठिकाणी ट्रिटमेंट केलेली आहे तर मला सांगा हे वैदयकीदृष्टया बरोबर आहे का. त्यांनी ते चुकीच केलेल असेलतर त्याला कारणीभूत कोण आहे आणि त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार.

डॉ.साळवे (अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्राथमिक स्तरावर दोष नाही असं आढळून येतं. आपले डॉ.पाटील आणि डॉ.मोसलगी यांना सगळी केस दाखवून रक्त देण्यामध्ये किंवा काही दोष राहीला का ही खात्री

करुन आपण घेतोय. या बरोबरच्च शासनाकडे येत्या आठवडयामध्ये या केसच्या पुर्ण उपचाराच ऑडीट आलेल आहे. शासनाची कमिटी आहे डेप्युटी डायरेक्टर लेव्हलला तर त्या कमिटीमध्ये ससूणचे तज्ञ डॉक्टर आपले तज्ञ डॉक्टर एकजीतपणे चर्चा करुन त्याची सर्व डिटेल माहीती घेवून नक्की मृत्यूच कारण काय याच्यावर अंतीम निर्णय होणं शक्य आहे.

मा.संदीप वाघेरे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. त्यांचा रिपोर्ट पॉझीटीव्ह आलेला आहे मग पवन साळवे निगेटीव्ह म्हणून कसे काय सांगतात. रिपोर्ट जर पॉझीटीव्ह आलेला आहे तो तुम्ही निगेटीव्ह आहे कस काय सांगता.

डॉ.साळवे (अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी)- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या वायसीएममध्ये केंद्रशासन मान्यताप्राप्त लॅब आहे त्यासाठी लागणारी संपुर्ण मशिनरी आहे येणा-या टेस्टींगची त्यासाठी आपले जे किट आहेत ते नॅशनल बॉयोलॉजी त्यांच्याकडचे प्राप्त आहेत आपण त्याच्यामध्ये शासनाच्या डेंग्युच्या संपुर्ण गाईडलाईन्स एकजीतपणे फॉलो करुन रीतसर तपासणी केली जाते तो आपला रिपोर्ट राज्यशासनाकडे ग्राहय धरला जातो आणि ज्युपीटरची जी आहे ती त्यांची स्वतंत्र अस्तित्वात आहे. आपण हा रिपोर्ट ग्रायह धरतो.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. साळवे साहेब तुम्ही सँपल कुठून कलेक्ट केले.

डॉ.साळवे (अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो सँपल आहे तो अंकुर हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी वायसीएमला सादर केला आहे. याची जी कमिटी आहे ती शासनाच्या डेप्युटी डायरेक्टरच्या ऑफिसमध्ये हेल्थ सर्व्हिसेसकडे याची मिटींग लावून याची कारवाई चालू आहे.

मा.संदीप वाघेरे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. साळवे साहेब अर्चना बारणे यांच्या प्लेटलेट कमी झाल्या मग त्या कुठल्या अजारामुळे कमी झाल्या.

डॉ.साळवे (अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्राथमिकदृष्टया आपली माहीती बरोबर आहे परंतु कुठल्याही प्रकारच्या व्हायरलमध्ये पेशंटच्या प्लेटलेट हे होवू शकतात.

मा.अभिषेक बारणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्ही दोन्ही हॉस्पिटलशी कॉन्टॅक्ट करायला पाहीजे होतं. दोन्हीचे रिपोर्ट घ्यायला पाहीजे होते. एक सन्मा.नगरसेवक जातात आणि तुम्ही असा वाद टाकताय काय प्रकार आहे तुमचा.

मा.संदीप वाघेरे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर साहेब, या गोष्टीत पवन साळवे वरती तुम्ही क्लेअरकट कारवाई करा. आज आपल्यातले एक नगरसेवक गेलेले आहेत यांच्या भोंगळ कारभारामुळ.

मा.अभिषेक बारणे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याला दिशाभूल म्हणायच. एक जबाबदार नगरसेवीका जाते त्यात जर कोणी एवढी लापरवाई करत असेलतर काय घाई झाली तुम्हांला त्या कशान गेल्या आणि काय गेल्या तुमच काय अपयश लपवायच

होतं का शहरात सर्वञ डेंग्यु पसरला म्हणून तुम्हांला घाई झाली होती. तुम्ही दोन तीन हॉस्पिटलचे नमुने घ्यायला पाहीजे होते, रिपोर्ट सगळयांचे घ्यायला पाहीजे होते. या डेंग्युला तुम्हीच जबाबदार आहात, प्रशासनच जबाबदार आहे. वायसीएमला डेंग्युचे पेशंट ऍडमीट आहेत का. पाच पेशंट आता डेंग्युचे वायसीएमला ऍडमीट आहेत माहीती आहे का तुम्हांला.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता साळवे डॉक्टरांनी सांगीतल मला असं वाटत की या संदर्भामध्ये ज्युपीटर हॉस्पिटलचा जो अहवाल आहे आणि मी मगाशी म्हणलो की त्याच्यामध्ये जो काही ब्लडग्रूप होता या संदर्भामध्ये तातडीने सखोल चौकशी झाली पाहीजे आणि ज्यांनी कोणी हे चुकीच केल असेल त्यांच्यावरती तातडीन आपण कारवाई केली पाहीजे अशाप्रकारच्या सुचना आपण आयुक्तांना दयाव्यात आणि ही सभा २९/७/२०२१ दुपारी २.०० पर्यंत तहकूब करावी.

मा.महापौर – सभागृहाच्या भावना लक्षात घेवून कै.अर्चनाताई बारणे यांना श्रध्दांजली वाहत असताना त्यांच्या मृत्युबद्दल आपल्या समोर अहवाल दिला गेला त्यात कोण म्हणत त्यांचा मृत्यू डेंग्युनी झाला परंतु महापालिकेचे डॉ.पवन साळवे यांच मत आहे की तो डेंग्युनी मृत्यू झाला नाही डेंग्युचे लक्षण त्यामध्ये आढळून आलेले नाहीत त्यामुळे डेंग्युनी त्यांची मयत झाली नाही. त्यांचा मृत्यू शंभर टक्के झालेला आहे पण तो कशामुळे झालेला आहे आणि इतक्या कमी कालावधीमध्ये कसा काय मृत्यू आला. एक तरुण नेतृत्व एवढया लवकर कशा पध्दतीने डेंग्युन खचल गेलं हा एक मोठा प्रश्न समोर उभा राहीलेला आहे. महीला महापौर या नात्याने सांगते की या सभागृहातली नगरसेवीका अर्चनाताई यांचा मृत्यू झालेला आहे आणि त्या मृत्यूच कारण समजल गेल पाहीजे. अर्चनाताईच्या मागे संपुर्ण सभागृह आहे त्यांच्या कुटूंबीयांच सांत्वन करत असताना या मृत्यूच खर कारणही समोर येणं हे तीतकच महत्वाच आहे म्हणून मी आयुक्त साहेबांना सांगू इच्छिते की कै.अर्चनाताई बारणे यांच्या मृत्यूच कारण हे सर्वाना कळणं महत्वाच आहे. खाजगी हॉस्पिटलमध्ये अर्चनाताई ऍडमीट होत्या त्या ठिकाणी त्या सिरीअस झाल्यानंतर ज्यूपिटरला त्यांना नेण्यात आलेल आहे आणि त्याठिकाणी त्यांचा मृत्यू झालेला आहे. आपण नंतर चौकशी केली की डेंग्युमुळे इतक्या लवकर माणूस जातो का हेही तीतकच महत्वाच आहे. ही सर्व माहीती आयुक्त साहेब तुम्ही सभागृहाला लवकरात लवकर कळवावी अशी मी सभागृहाच्या वतीने आपल्याला विनंती करते सर्वानी श्रध्दांजली वाहीलेली आहे मी अर्चनाताईना श्रध्दांजली अर्पण करते आणि ही सभा गुरुवार दिनांक २९/७/२०२१ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे**)**

महापौर

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -४११ ०१८.

.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –६०

सभावृत्तांत

(दि.२०/७/२०२१ ची तहकूब सभा)

दिनांक –२९.७.२०२१ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दिनांक **२०/०७/२०२१** ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दिनांक २९/७/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दिनांक ३ जुलै २०२० व दिनांक २८ जून २०२१ च्या पत्रान्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजीत करणेत आलेली आहे. मा.महापौर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरुन ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केले होते. सभेस खालील सन्मा.सदस्य संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे सभागृहातून ऑनलाईन पध्दतीने अथवा मोबाईल ऍपद्वारे उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे - महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन - उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.वसंत प्रभाकर बोराटे

९) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास

११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.गायकवाड निर्मला मनोज

१५) मा.गोफणे अनुराधा देविदास

१६) मा.बारसे प्रियांका प्रविण

१७) मा.अजित दामोदर गव्हाणे

१८) मा.लांडगे सारिका संतोष

१९) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२०) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२१) मा.सावळे सिमा रविंद्र

२२) मा.लोंढे नम्रता योगेश

२३) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२४) मा.गीता सुशिल मंचरकर

२५) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२६) मा.केशव हनुमंत घोळवे

२७) मा.अश्विनी भीमा बोबडे

२८) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२९) मा.संजय बबन नेवाळे

३०) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३१) मा.भालेकर प्रविण महादेव

३२) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३३) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३४) मा.पंकज दत्ताञय भालेकर

३५) मा.चिखले सचिन तुकाराम

३६) मा.यादव मीनल विशाल

३७) मा.प्रमोद कुटे

३८) मा.राजू मिसाळ

३९) मा.शैलजा अविनाश मोरे

४०) मा.बाबर शर्मिला राजू

४१) मा.अमित राजेंद्र गावडे

४२) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४३) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४४) मा.ढाके नामदेव जनार्दन

४५) मा.भोईर सुरेश शिवाजी

४६) मा.अपर्णा निलेश डोके

४७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४८) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

४९) मा.जयश्री वसंत गावडे

५०) मा.कोमल दिपक मेवानी

५१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५२) मा.सुलक्षणा राजू धर

५३) मा.शाम गणपतराव लांडे

५४) मा.योगेश मंगलसेन बहल

५५) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५६) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५७) मा.काळे उषा दिलीप

५८) मा.कोकणे संतोष अंकुश

५९) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६१) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

६२) मा.कलाटे राहुल तानाजी

६३) मा.कलाटे मयूर पांडुरंग

६४) मा.ममता विनायक गायकवाड

६५) मा.कामठे तुषार गजानन

६६) मा.चोंधे आरती सुरेश

६७) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

६८) मा.सविता बाळकृष्ण खुळे

६९) मा.सुनिता हेमंत तापकीर

७०) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७१) मा.आंगोळकर सागर सुनिल

७२) मा.मुंढे उषा अंकुश

७३) मा.कदम शशिकांत गणपत

७४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

७५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

७६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

७७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

७८) मा.नवनाथ दत्तू जगताप

७९) मा. संजय मल्हारराव वाबळे

८०) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

८१) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.नाळे-उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.चारठाणकर, मा.झगडे, मा.खोत- उपआयुक्त, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.भालकर - सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.देशमुख, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठता वायसीएमएच, कुलकर्णी-सह शहर अभियंता मा.वाघुंडे-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.महापौर – उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.केशव घोळवे - मा.महापौर साहेब, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, महाड मधील तळीये गावासह पुर आणि दरडी कोसळल्यामुळे १४९ नागरीकांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली वाहणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

मा.घुले नानी उर्फ हिराबाई- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

मा.महापौर - श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.पक्षनेते, मा.विरोधीपक्षनेते, सर्व पक्षाचे गटनेते व मा.आयुक्त यांच्या हास्ते पदमश्री गिरीष प्रभुणे, राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिवकुमार लिंबाळे, दंत

शल्यचिकित्सक डॉ.यशवंत इंगळे यांचा स्मृतीचिन्ह, शाल आणि पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला, तसेच एस.व्ही.कांबळे, लघुलेखक यांचा सेवानिवृत्ती निमीत्त सत्कार करण्यात आला.)

मा.आरती चोंधे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६५५ विषय क्रमांक – १

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूजि/८/कावि/५०/२०२१, दि.१७/०५/२०२१

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९५१८ दि.२७/०५/२०२१

पिंपरी चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीसआयुक्त कार्यालय दि.१५/०८/२०१८ पासून नव्याने सुरु झालेले आहे. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड यांचेकडीलपत्र क्र. पोउआ/परि.२/बांधकाम/२०८८/२०२१, दि.१५/०४/२०२१ व दि.२३/१२/२०२०नुसार परिमंडळ-२ च्या हद्दीतील सांगवी, वाकड, हिंजवडी, चिखली, देहुरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी हे ७ पोलीस स्टेशन तसेच शिरगाव व रावेतस्वतंत्र पोलीस चौकी हा भाग येतो. सदर ठिकाणी पोलीस विभागाचे कार्यालय सुरुझाल्यास कायदा सुव्यवस्था व प्रशासकिय कामकाज करणे सोईचे होणार आहे. तसेचपोलीस आयुक्तालयातील अधिकारी वर्गासाठी स्वतंत्र निवासस्थान उभारता येऊ शकते. याकरीता खालील I to R ची जागा सुविधा भुखंडाची मागणी केलेली आहे.

अ.क्र.	गावाचे नांव व स.नं .	जागेचा तपशील	क्षेत्रपळ
१	मौजे वाकड स.नं. १११/१/१मधील१८ गुंठे	मौजे वाकड I to Rचे बदल्यात मिळालेली मोकळी जागा सुविधा भुखंड	मोकळी जागा१८ गुंठे-१७९१.८६चौ.मी.१९२८७.५८ चौ.फुट
२	मौजे पुनावळे स.नं. १२/१ ते ७ पै.मधील ३.५ गुंठे	मौजे पुनावळे I to Rचे बदल्यात मिळालेली मोकळी जागा सुविधा भुखंड	मोकळी जागा-३.५ गुंठे-३५३.२७४चौ.मी.३८०२.५९ चौ.फुट

मागणी केलेली जागा I to R चे बदल्यात मनपास मिळालेली आहे. सदर सुविधा भुखंड पोलीस विभागास ३० वर्षाच्या कालावधीसाठी पि.चिं. मनपाचे उप संचालक नगररचना, विभाग हे निर्धारित करतील त्यादराने भुईभाडे आकारुन दर ५वर्षानंतर प्रचलित दराने भाडे वाढ सादर करुन ३० वर्षाच्या कालावधीकरिता देण्याचा प्रस्ताव आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ पिंपरी चिंचवडकरीता मौजे वाकड

स.नं.१११/१/१ पैंकी येथील १८ गुंठे व मौजै पुनावळेस.नं.१२/१ ते ७ पै. मधील ३.५ गुंठे I to R ची मोकळी जागा सुविधा भुखंड पिं.चिं.म.न.पा.च्या नियम/अटी शर्तीनुसार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ चे कार्यालयास ३० वर्षाच्या कालावधीसाठी दर ५ वर्षाने प्रचलित दराने भाडेवाढ या अटींस अधिन राहून भुई-भाड्याने वापरासाठी देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ क नुसार मान्यता देणेत येत आहे.

मा.शर्मिला बाबर - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.सचिन चिखले - मा.महापौर साहेब, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, अत्यंत महत्वाचा आणि खुप चांगला विषय आहे. याच्यामध्ये आमच्या काही सुचना आहेत. ज्यावेळेस पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाली त्यावेळेस पहीले पोलीस आयुक्त म्हणून पद्मनाभन साहेब होते. त्यावेळेस मी त्यांच्या बरोबर एक मिटींग घेतली होती आणि त्यामध्ये मी काही सूचना दिल्या होत्या त्या सूचना अशा आहेत माझ्या प्रभागामध्ये निगडी पोलीस ठाणे आहे आणि निगडी पोलीस ठाण्याच अंतर आणि सिध्दीविनायक नगरीच अंतर फक्त एक कि.मी.असेल आणि सिध्दीविनायक नगरीमधील लोकांना पोलीस स्टेशनला जायच म्हणलतर सहा कि.मी. जाव लागत आणि सिध्दीविनायक नगरी महापालिकेच्या शेजारी असल्यामुळे ग्रामीण भाग पडत असल्यामुळे त्या परिसरामध्ये दरोडे त्याचप्रमाणे काही दिवसापुर्वी एक घटना घडली होती की दिवसाढवळया एका घरातील तीन ते चार व्यक्तींचा मर्डर करण्यात आला होता. निगडी पोलीस ठाणे अंतर्गत सिध्दीविनायक नगरीचा समावेश करुन घ्यावा जेणेकरुन एखादी घटना घडत असेलतर लोकांना लवकरात लवकर पोलीस स्टेशनमध्ये येता येईल आणि तीथे कम्प्लेन्ट वगैरे करुन पाच मिनीटामध्ये पोलीस तीथे पोहचतील. दुसरा विषय असा की निगडी पोलीस ठाण्याची जी काही हद्द आहे ती पुर्णपणे चिंचवड स्टेशन पर्यंत येते पण समोरच चिंचवड पोलीस स्टेशन चौकी आहे. निगडी पोलीस स्टेशनला चिंचवड पोलीस स्टेशन पर्यंत याव लागतं पण समोरच अक्षरश: दहा मिटरवर चिंचवड पोलीस स्टेशन आहे तो एक परिसर त्याच्यातून कमी करावा आणि निगडी पोलीस स्टेशनला सिध्दीविनायकनगरी परिसर हा जोडून घ्यावा, हा सर्वात महत्वाचा विषय आहे आपण याच्यामध्ये लक्ष घालाव अशी मी तुम्हांला नंम्र विनंती करतो. दुसरी गोष्ट पिंपरी चिंचवड शहरामध्ये सर्व पक्षानी अंदोलन केली मग ती गुन्हेगारी असेल, चोरी असेल, दरोडे असतील त्याच प्रमाण कमी कसं होईल याच्याकडे आपण लक्ष दिल होतं आणि त्या अनुषंगाने आपण आयुक्तालय करण्यासाठी प्रयत्नशील राहीलो. शहरामध्ये कायदा आणि सुव्यवस्थाची भीती मनामध्ये राहीलेली दिसत नाही. चो-यांच प्रमाण वाढलेल आहे याकड आपल्याला सगळयांना जातीन पाहील पाहीजे जेणेकरुन नागरीकांमध्ये जे भीतीच वातावरण आहे ते कमी केल पाहीजे. मला असं वाटतय की नक्कीच आपले पोलीस आयुक्तालय याच्याकडे जातीने लक्ष देतील. परंतु जेव्हापासून पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड शहरामध्ये झाल आहे तेव्हापासून माझ्या निदर्शनास असं आलेल आहे की याच प्रमाण मोठया प्रमाणात वाढलेल आहे याच्याकडे आपल्या सगळयांनाच जातीन लक्ष दयाव लागेल, एवढ बोलून थांबतो धन्यवाद.

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, ही जी ताथवडेची जागा आहे याच्यात आपण वाकड मधील इंदिरा कॉलेज

रोडवरची एक जागा आणि पुनावळेतील एक जागा या दोन जागा आपण त्यांना त्यावेळेस सुचवल्या होत्या. परंतु ही जी १७.९८ जागा आहे याच्या ऐवजीच त्याठिकाणीच सर्व्हे नं. ९९ मध्ये पंधरा गुंठयाच रिझर्व्हेशन ताब्यात येत आहे ज्याच्यावर पोलीस स्टेशनच रिझर्व्हेशन आहे याच्या ऐवजी आपण ती जागा देवू जर ही जागा नाही मिळालीतर आणि ३.५ गुंठयाची गरज नाही असं त्यादिवशी एसीपी साहेब म्हणाले, आणि याच्या बरोबर आपण याच्यावर दहा कोटीच हेड केलेल आहे व दोन कोटीची तरतूद आहे. यामुळे आपण लवकरात लवकर आर्कीटेक्ट नेमुन याची कारवाई करु या. त्या भागात पोलीस स्टेशन, पोलीस चौकी होण हे देखील गरजेचे आहे. पण हे होत असताना या जागेच्याऐवजी जर पोलीस स्टेशनच्या रिझर्व्हेशनच्या दोन जागा त्या जवळपासच आहेत एक पंधरा गुंठे आणि दुसरी पाच गुंठे त्यांचही निगोसिएशन शेवटच्या स्टेजवर आहे, आयुक्त साहेब पण बोलतात मी पण त्या लोकांना विनंती करतो. ते जर झालतर ही जागा महापलिकेकडे राहील आणि त्या भागात एकही हॉस्पिटलच रिझर्व्हेशन नाही. तरी आपण हा विषय मंजूर करताना या सगळया गोष्टी प्रशासनाने तपासून मंजूर कराव्यात अशी मी आपल्याला विनंती करतो. त्याठिकाणी पोलीस स्टेशन हवे आहे आणि माझ असंही मत होतं की ज्यावेळेस आपण त्यांना याठिकाणी बांधुन देवू, त्यावेळेस पुढच्या बाजुला एक पोलीस स्टेशन, पोलीस चौकी होईल आणि मागच्या बाजुला त्यांना घर बांधायची आहेत आणि ती घर बांधत असताना जर महापालिका खर्च करणार आहे आपण दहा कोटीचा हेड केला आहे व दोन कोटी तरतूद केलेली आहे. याच्यात जर दहा बारा मजल्याची बिल्डींग झाली किंवा रोहाऊस झालेतर त्यात अर्धे हे आपल्या शहरासाठी राहतील, का तर आपण खर्च करतो कारण आपले अधिकारी, उपायुक्त यांना देखील शहरात राहण्यासाठी जागा नाही. आयुक्त साहेब त्यांच्या लेव्हलवरती बोलतात की तुझ्या ताब्यात असलेली पाच गुंठे आणि ही पंधरा गुंठे या दोन्ही जागा जर आपल्याला मिळाल्यातर त्याठिकाणी पोलीस चौकी किंवा उपआयुक्त कार्यालय या दोन्ही गोष्टीच्या सुविधा त्यांच्या त्यांच्या ओन रिझर्व्हेशन असलेल्या जागेत होतात. ते झालतर ही आठरा गुंठे जागा आपल्या महापालिकेस बाकीच्या सुविधासाठी पाण्याची टाकी आहे, एक छोटस हॉस्पिटल आहे याच्यासाठी आपल्याला वापरता येईल. तरी हा विषय मंजूर करताना आपण या सगळया बाबींचा विचार करावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, याठिकाणी आपल्या शहराचा विस्तार मोठया प्रमाणात होत असताना आता नव्यानेच आपल्या कारकीर्दीत याठिकाणी पोलीस आयुक्तालयाला परमीशन दिलेली आहे. त्या अनुषंगाने आपण बघीतलतर वाकड, हिंजवडी, चिखली, देहूरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी आणि सांगवी अशा सात पोलीस स्टेशनचा समावेश परिमंडल-२ मध्ये होतो. त्या अनुषंगाने नव्याने हा जो काही शहराचा विस्तार होतो, मोठया प्रमाणात नागरीकरण होताय, मोठया प्रमाणात त्याठिकाणी बिल्डींगा तयार होतात त्या अनुषंगाने त्या भगामध्ये वाकड १११/१/१ मधील आठरा गुंठे जागा आयुटूआरच्या माध्यमातून महापलिकेला मिळालेली आहे आणि तशाच पध्दतीने पुनावळे येथील १२/१ ते ७ पैकी मधील ३.५ गुंठे जागा आपल्या महानगरपालिकेला मिळालेली आहे. याठिकाणी हया विषयी पोलीस आयुक्तालयाच्या माध्यमातून आपल्या महापालिकेकडे सातत्याने, वारंवार जागेची मागणी होते आणि तातडीने त्यांना जागा उपलब्ध करुन दिल्याच्यानंतर त्यांच्याकडून ती बांधले जाणार आहे आणि म्हणून

हा विषय याठिकाणी आलेला आहे. आपण जर विचार केलातर पोलीस कोणासाठी काम करतात तर पोलीस शहरातील नागरीकांसाठी काम करतात. शहरामधील कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच काम याठिकाणी पोलीसांच्या माध्यमातून केल जातय. आपल्याला जागा मिळालेली आहे, दोन्ही जागेच्या माध्यमामधुन आपल्याला ही जागा त्वरीत त्यांच्याकडे हस्तांतर करता आलीतर तातडीने त्याठिकाणी परिमंडल-२ कार्यालय त्याठिकाणी होणार आहे. तो भाग मोठया प्रमाणात विकसीत होतो त्या भागामध्ये कायदा, सुव्यवस्था निर्माण होत असताना त्याठिकाणी परिमंडल-२ च्या संदर्भामध्ये त्यांनी जी मागणी आपल्याकडे केलेली आहे की ती जागा तातडीने दयावी म्हणून हा विषय आपल्याकडे आलेला आहे. ती जागा आपल्याला आयटूआरच्या माध्यमातून मिळालेली आहे. तरी मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की हा विषय आपण मंजूर करावा आणि पोलीस आयुक्तालयाच त्याठिकाणी तातडीने कार्यालय व्हाव ही भूमीका याच्या मागची आहे.

मा.राहुल कलाटे - मा.महापौर साहेब, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, हा विषय मंजूर करत असताना त्याच्याच बाजूला महापालिकेच्या डीपीत त्याचच रिझर्व्हेशन आहे. उदया असं व्हायला नको की बाजूच्या दोन जागा त्यांच्या त्यांच्याकडे जातील हे होण्याच्या अगोदर जर ते झालतर त्यामुळे त्यांची जागा त्यांनाच मिळेल हा पण विषय आपण मंजूरी करताना लक्षात असु दया. विषय मंजूर करत असताना आज रोजी साडेतीन ऐवजी पाच आणि आठरा ऐवजी पंधरा गुंठे हे तीतक रिझर्व्हेशनच आहे हे रिझर्व्हेशन आलतर आपल्या या जागा वाचतील आणि आपल्या जागा आपल्याला बाकीच्या प्रयोजनासाठी घेता येतील. ही प्रक्रीया सुरु असताना सायमेन्टेनली जर ते ताब्यात आलतर आपल्याला त्यांच्या जागा त्यांना देता येतील आणि आपल्या जागा आपल्याकडे राहतील.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, राहूल कलाटेनी म्हणल्याप्रमाणे ठिक आहे आपल्याला पोलीसांच्यासाठी अजून त्यांना राहण्यासाठी त्यांना बिल्डींग बनवायची आहे किंवा आणखीन त्यांच्या ब-याच मागण्या आपल्याकडे आहेत परंतु हा तातडीचा विषय आहे.

मा.आशा धायगुडे-शेंडगे - मा.महापौर साहेब, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, आता राहूल कलाटे जे म्हणाले त्याच्यामध्ये तथ्य आहे. जर ही जागा दयावी का तर निश्चितपणे दिली पाहीजे, जस आता म्हणल गेल की पोलीस सुध्दा आपलेच काम करतात पण त्याच बरोबर डिझाईन तयार होईपर्यंत आता राहूल कलाटे म्हणाले त्याप्रमाणे आरक्षण ताब्यात आलतर आपण त्वरीत त्याठिकाणी शिफ्ट कराव जेणेकरुन आपल आरक्षण हे आपल्या शहराच्या हितासाठी वापरता येईल. याची आपण उपसूचना जर घेतलीतर निश्चिपणे ख-या अर्थाने या विषयाला न्याय दिल्यासारखा होईल, धन्यवाद.

मा.महापौर - विषय क्रमांक १ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-५४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.शर्मिला बाबर - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्तयांचे पत्र क्र.प्रशा/११/कावि/२९५/२०२१, दि.१८/०६/२०२१
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९८०५ दि.२३/०६/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ व ६७ मधील तरतूदीस अनुसरुन मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७४८५ दि.१६/९/२०२० व मा.महापालिका सभा ठराव क्र.५७० दि.१३/१०/२०२० यांचे मान्यतेने मा.आयुक्त सो. यांचेकडील आदेश क्र.प्रशा/११/कावि/४८५/२०२० दि.२६/१०/२०२० व क्र. प्रशा/११/कावि/१२८/२०२१ दि.१०/३/२०२१ अन्वये २४ मार्च, २०२० ते १७ मे, २०२० व १४ जुलै, २०२० ते २३ जुलै, २०२० या ६५ दिवसाच्या लॉकडाऊन कालावधीमध्ये कोरोना विषयक काम करणारे महानगरपालिका विविध विभागाकडील कर्मचारी, मानधनावरील, ठेकेदाराकडे काम करीत असलेले कर्मचारी, प्रशिक्षणार्थी (कोपा-पासा) तसेच भांडार विभाग व इतर विभागातील कर्मचारी यांना प्रत्यक्ष केलेल्या कामांच्या प्रमाणात हजर दिवसाप्रमाणे प्रतिदिन १५०/- (अक्षरी- र.रु एकशे पन्नास फक्त) प्रोत्साहन भत्ता मंजूर करणेत आला आहे. सद्दिस्थतीतील “कोरोना” विषाणू (COVID-19) दुसरी लाट असून पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात कोविड-१९ बाधित रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. “कोरोना विषाणू” (COVID-19) प्रादूर्भाव रोखण्यासाठी निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थतीचा सामना करणेच्या अनुषंगाने कोरोना विषाणूमुळे निर्माण झालेल्या आजाराचे पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपायोजना करणे करिता मनपाच्या वतीने उपाययोजना करणेत येत आहेत.“कोरोना विषाणू” (COVID-19) चे काळात कामकाज करणा-या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासह महापालिका रूग्णालय / दवाखाना येथील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना स्वतंत्र कोविड भत्ता अदा करणेबाबत वैद्यकिय मुख्य कार्यालयामार्फत दि.१९/०५/२०२१ रोजी मा.आयुक्त सो यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला होता .त्यानुसार महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय तसेच मनपाची इतर रूग्णालये व दवाखाने याठिकाणी कोविड-१९ च्या काळात मानधनावर कार्यरत असलेल्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी /वैद्यकिय अधिकारी तसेच दंत शल्यचिकीत्सक यांना र.रु.१५०००/- , स्टाफ नर्स व सर्व पॅरामेडीकल स्टाफ यांना र.रु.१०,०००/- तसेच प्रयोगशाळा सहाय्यक/वर्ग ४ मधील कर्मचारी यांना र.रु.५,०००/- याप्रमाणे मासिक वेतनाव्यतिरिक्त स्वतंत्र कोविड भत्ता १ एप्रिल २०२१ पासून ३० जून २०२१ अखेर दरमहा अदा करणेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९४५०, दि.१२/०५/२०२१ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यासंदर्भातील कार्यवाही वैद्यकिय विभागाकडून करणेत आलेली आहे. त्याच धर्तीवर, महानगरपालिकेच्या यशवंतराव

चव्हाण स्मृती रूग्णालय तसेच मनपाची इतर रूग्णालये व दवाखाने याठिकाणी कोविड१९च्या काळात आस्थापनेवर कार्यरत असलेले वैद्यकिय तांत्रिक संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांना खालील देय प्रमाणे कोविड भत्ता मंजुरी बाबत प्रस्तावित केले आहे.

अ.क्र.	महापालिका रुग्णालय/दवाखानामधील स्थायी अस्थापनेवरील कार्यरत वैदयकीय तज्ञ / वैदयकीय अधिकारी/इतर कर्मचारी	स्वतंत्र कोविड भत्ता र.रु.
१	वर्ग १ व २	१५,०००/-
२	वर्ग - ३	१०,०००/-
३	वर्ग४-	५,०००/-

प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासन विभागामार्फत करणेबाबत मा.अति.आयुक्त (१) यांना शेरांकन केले आहे सदर शेरांकनानुसार मा.आयुक्त् सो. मान्यता दिलेली आहे. सादर करणेत आलेल्या प्रस्तावानुसार नमुद देयनुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

अ.क्र.	वर्ग	एकूण कर्मचारी संख्या		एकूण	दरमहा कोविड भत्ता	एकूण र.रु.
		वैद्यकिय	वायएच.एम.सी.			
१	२	३	४	५ (३+४)	६	७ (५X६)
१	वर्ग-१	१६	६८	८४	१५,०००/-	१२,६०,०००/-
२	वर्ग-२	७४	१४	८८	१५,०००/-	१३,२०,०००/-
३	वर्ग-३	३०६	२८१	५८७	१०,०००/-	५८,७०,०००/--
४	वर्ग-४	२४६	१५१	३९७	५,०००/-	१९,८५,०००/-
एकूण	**वर्ग १ ते ४**	**६४२**	**५१४**	**११५६**	**--**	**१,०४,३५,०००/-**

वरील प्रमाणे कोविड भत्ता संबंधितांना अदा करावयाचा झाल्यास माहे १ एप्रिल २०२१ ते ३०जून २०२१ करिता एकूण खर्च र.रु.१,०४,३५,०००/- (अक्षरी र.रु. एक कोटी चार लाख पस्तीस हजार फक्त) प्रतिमाह अपेक्षित आहे. सदरचा कोविड भत्ता माहे १ एप्रिल २०२१ ते ३० जून २०२१ करिता कालावधीमध्ये मंजूर करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार वरील दराने कोविड भत्ता अदा करणेस तसेच जागतिक महामारी कोविड-१९ अंतर्गत कामकाज करणा-या मानधनावरील वैद्यकिय अधिकारी यांना र.रू.१५,०००/- प्रजनन व बाल आरोग्य (RCH), राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP) अंतर्गत मानधनावर कार्यरत असलेले शहर कार्यक्रम व्यवस्थापक, शहर लेखा व्यवस्थापक, लेखापाल, लिपिक, ए.एन.एम., डेटाएन्ट्री ऑपरेटर तथा लेखापाल स्टाफनर्स, वरिष्ठ डॉटस प्लस व क्षयरोग एच.आय.व्ही. पर्यवेक्षक, वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक, वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक, टि.बी.हेल्थ व्हिजीटर, पि.पी.एम. कॉर्डीनेटर, फार्मासिस्ट, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, बालवाडी शिक्षिका व आशा स्वयंसेविका यांना र.रू.१०,०००/- तसेच मदतनीस व ड्रायव्हर यांना र.रू.५,०००/- याप्रमाणे एप्रिल, २०२१ ते ३० जून २०२१ अखेर कोविड भत्ता देणेस मान्यता देणेत यावी.

मा.योगिता नागरगोजे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने संपुर्ण शहरभर कोव्हीड १९ च्या वैश्विक महामारीवर अतिशय कार्यक्षमपणे काम करणारे वरील विषयात नामनिर्देशत केलेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक सर्व स्तरांतुन तसेच राज्याचे मुख्यमंञी व शहराचे पालकमंञी यांनी कौतुक केलेले आहे. तसेच स्वत:ची जिवाची पर्वा न करता खुप मोठी जोखीम पत्कारुन रुग्णांना वाचविण्याची, सेवा देण्याची कार्य आहोराञ केलेले आहे. तरी वरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना माहे एप्रिल २०२१ ते जुन २०२१ (तीन महीन्यांचा) प्रतिमाह र.रु. १०,०००/- प्रमाणे तीन महीन्याचा र.रु. ३०,०००/- कोव्हीड भत्ता अदा करणेस मान्यता देणेत यावी.

मा.सागर आंगोळकर – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.शर्मिला बाबर – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ६५६ विषय क्रमांक – २

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्तयांचे पत्र
क्र.प्रशा/११/कावि/२९५/२०२१, दि.१८/०६/२०२१
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९८०५ दि.२३/०६/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ व ६७ मधील तरतूदीस अनुसरुन मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७४८५ दि.१६/९/२०२० व मा.महापालिका सभा ठराव क्र.५७० दि.१३/१०/२०२० यांचे मान्यतेने मा.आयुक्त सो. यांचेकडील आदेश क्र.प्रशा/११/कावि/४८५/२०२० दि.२६/१०/२०२० व क्र. प्रशा/११/कावि/१२८/२०२१ दि.१०/३/२०२१ अन्वये २४ मार्च, २०२० ते १७ मे, २०२० व १४ जुलै, २०२० ते २३ जुलै, २०२० या ६५ दिवसाच्या लॉकडाऊन कालावधीमध्ये कोरोना विषयक काम करणारे महानगरपालिका विविध विभागाकडील कर्मचारी, मानधनावरील, ठेकेदाराकडे काम करीत असलेलेकर्मचारी, प्रशिक्षणार्थी (कोपा-पासा) तसेच भांडार विभाग व इतर विभागातील कर्मचारी यांना प्रत्यक्ष केलेल्या कामांच्या प्रमाणात हजर दिवसाप्रमाणे प्रतिदिन १५०/- (अक्षरी- र.रु एकशे पन्नास फक्त) प्रोत्साहन भत्ता मंजूर करणेत आला आहे. सद्स्थितीतील"कोरोना" विषाणू (COVID-19) दुसरी लाट असून पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात कोविड-१९ बाधित रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. "कोरोना विषाणू" (COVID-19) प्रादूर्भाव रोखण्यासाठी निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थतीचा सामना करणेच्या अनुषंगाने कोरोना विषाणूमुळे निर्माण झालेल्या आजाराचे पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपायोजना करणे करिता मनपाच्या वतीने उपाययोजना करणेत येत आहेत."कोरोना विषाणू" (COVID-19) चे काळात कामकाज करणा-या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासह महापालिका रूग्णालय / दवाखाना येथील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना स्वतंत्र कोविड भत्ता अदा करणेबाबत वैद्यकिय मुख्य

कार्यालयामार्फत दि.१९/०५/२०२१ रोजी मा.आयुक्त सो यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला होता .त्यानुसार महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय तसेच मनपाची इतर रूग्णालये व दवाखाने याठिकाणी कोविड-१९ च्या काळात मानधनावर कार्यरत असलेल्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी /वैद्यकिय अधिकारी तसेच दंत शल्यचिकीत्सक यांना र.रु.१५०००/-, स्टाफ नर्स व सर्व पॅरामेडीकल स्टाफ यांना र.रु.१०,०००/- तसेच प्रयोगशाळा सहाय्यक/वर्ग ४ मधील कर्मचारी यांना र.रु.५,०००/- याप्रमाणे मासिक वेतनाव्यतिरिक्त स्वतंत्र कोविड भत्ता १ एप्रिल २०२१ पासून ३० जून २०२१ अखेर दरमहा अदा करणेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९४५०, दि.१२/०५/२०२१ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यासंदर्भातील कार्यवाही वैद्यकिय विभागाकडून करणेत आलेली आहे. त्याच धर्तीवर, महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय तसेच मनपाची इतर रूग्णालये व दवाखाने याठिकाणी कोविड१९च्या काळात आस्थापनेवर कार्यरत असलेले वैद्यकिय तांत्रिक संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांना खालील देय प्रमाणे कोविड भत्ता मंजुरी बाबत प्रस्तावित केले आहे.

अ.क्र.	**महापालिका रुग्णालय/दवाखानामधील स्थायी अस्थापनेवरील कार्यरत वैदयकीय तज्ञ / वैदयकीय अधिकारी/इतर कर्मचारी**	**स्वतंत्र कोविड भत्ता र.रु.**
१	वर्ग १ व २	१५,०००/-
२	वर्ग - ३	१०,०००/-
३	वर्ग४-	५,०००/-

प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासन विभागामार्फत करणेबाबत मा.अति.आयुक्त (१) यांना शेरांकन केले आहे सदर शेरांकनानुसार मा.आयुक्त सो. मान्यता दिलेली आहे. सादर करणेत आलेल्या प्रस्तावानुसार नमुद देयनुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

अ.क्र.	**वर्ग**	**एकूण कर्मचारी संख्या**		**एकूण**	**दरमहा कोविड भत्ता**	**एकूण र.रु.**
		वैद्यकिय	**वायएच.एम.सी.**			
१	२	**३**	४	**५ (३+४)**	६	७ (५X६)
१	वर्ग-१	१६	६८	८४	१५,०००/-	१२,६०,०००/-
२	वर्ग-२	७४	१४	८८	१५,०००/-	१३,२०,०००/-
३	वर्ग-३	३०६	२८१	५८७	१०,०००/-	५८,७०,०००/--
४	वर्ग-४	२४६	१५१	३९७	५,०००/-	१९,८५,०००/-
एकूण	**वर्ग १ ते ४**	**६४२**	**५१४**	**११५६**	**--**	**१,०४,३५,०००/-**

वरील प्रमाणे कोविड भत्ता संबंधितांना अदा करावयाचा झाल्यास माहे १ एप्रिल २०२१ ते ३०जून २०२१ करिता एकूण खर्च र.रु.१,०४,३५,०००/- (अक्षरी र.रु. एक कोटी चार लाख पस्तीस हजार फक्त) प्रतिमाह अपेक्षित आहे. सदरचा कोविड भत्ता माहे १ एप्रिल २०२१ ते ३० जून २०२१ करिता कालावधीमध्ये मंजूर करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार वरील दराने कोविड भत्ता अदा करणेस तसेच जागतिक महामारी कोविड-१९ अंतर्गत कामकाज करणा-या मानधनावरील वैद्यकिय अधिकारी यांना र.रू.१५,०००/- प्रजनन व बाल आरोग्य (RCH), राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM)व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP)अंतर्गत मानधनावर कार्यरत असलेले शहर कार्यक्रम व्यवस्थापक, शहर लेखा व्यवस्थापक, लेखापाल, लिपिक, ए.एन.एम., डेटाएन्ट्री ऑपरेटर तथा लेखापाल स्टाफनर्स, वरिष्ठ डॉटस प्लस व क्षयरोग एच.आय.व्ही. पर्यवेक्षक, वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक, वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक, टि.बी.हेल्थ व्हिजीटर, पि.पी.एम. कॉर्डीनेटर, फार्मासिस्ट, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, बालवाडी शिक्षिका व आशा स्वयंसेविका यांना र.रू.१०,०००/- तसेच मदतनीस व ड्रायव्हर यांना र.रू.५,०००/- याप्रमाणे एप्रिल, २०२१ ते ३० जून २०२१ अखेर कोविड भत्ता देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने संपुर्ण शहरभर कोव्हीड १९ च्या वैश्विक महामारीवर अतिशय कार्यक्षमपणे काम करणारे वरील विषयात नामनिर्देशत केलेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक सर्व स्तरांतुन तसेच राज्याचे मुख्यमंञी व शहराचे पालकमंञी यांनी कौतुक केलेले आहे. तसेच स्वत:ची जिवाची पर्वा न करता खुप मोठी जोखीम पत्करुन रुग्णांना वाचविण्याची, सेवा देण्याची कार्य आहोराञ केलेले आहे. तरी वरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना माहे एप्रिल २०२१ ते जुन २०२१ (तीन महीन्यांचा) प्रतिमाह र.रु. १०,०००/- प्रमाणे तीन महीन्याचा र.रु. ३०,०००/- कोव्हीड भत्ता अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ५४ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.शर्मिला बाबर – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/५५१/२०२१, दि.०७/०६/२०२१
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र. ४० दि. १८/०६/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' अभिनामाची १६ पदे S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००मध्ये शासन मंजूर असून ४ पदे रिक्त आहेत. 'ज्येष्ठवैद्यकीय अधिकारी' अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ३१/०५/२०२१ रोजी

आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व' वैद्यकीय अधिकारी' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवा विषयक तपशिल पडताळून, खालील वैद्यकीय अधिकारी गट–ब यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' पदावर **S-२३** वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

अ.क्र	दि.०१/०१/२०२० रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीतील क्रमांक	वैद्यकीय अधिकारी नावं	पदोन्नतीचा प्रवर्ग
१	१४	डॉ.मंडपे रविंद्र नारायण	ज्येष्ठतेनुसार
२	१५	डॉ.अलवी सय्यद नासेर इब्राहीम	ज्येष्ठतेनुसार
३	१७	डॉ.ढगे शिवाजी त्रिंबकराव	ज्येष्ठतेनुसार

सबब, उपरोक्त वैद्यकीय अधिकारी यांना **S-२३** वेतनश्रेणी र.रु ६७७००–२०८७०० मध्ये 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठते नुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी.

मा. योगीता नागरगोजे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **"सहाय्यक संचालक नगररचना"** या संवर्गातील गट-अ मधील दर्जाचे वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेडवेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगा नुसार) शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२१/प्र.क्र.५२/नवि-२२, दिनांक २१ जून २०२१ अन्वये शासन मंजूर झालेले आहे. या पदावर अनुभव व शैक्षणिक पात्रता धारण करणारे पदोन्नतीपुर्व पदावरील कार्यरत असलेले मनपा अधिकारी श्री.प्रशांत शिंपी, नगररचनाकार यांना **"सहाय्यक संचालक नगररचना"** या गट-अ मधील पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "उप आयुक्त" या संवर्गातील गट-अ

मधील शासन मान्य रिक्त पदांवर नियमानुसार सेवाजेष्ठता, अनुभव व शैक्षणिक पात्रता धारण करणारे पदोन्नतीपुर्व पदावरील कार्यरत असलेले श्री.अण्णा यशवंतराव बोदडे, सहा. आयुक्त यांना "उप आयुक्त" या गट-अ मधील रिक्त पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर शासन मंजूर असलेल्या सहाय्यक आयुक्त या रिक्त पदांवर नियमा नुसार सेवाज्येष्ठता, शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणारे पात्रताधारक पदोन्नतीपूर्व प्रशासन अधिकारी या पदावरील सेवाज्येष्ठ अधिकारी श्री.दिलीप बबन आढारी व श्री. वामन बाबुराव नेमाणे यांना पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील "सह शहर अभियंता (स्थापत्य)" अभिनामाची ५ पदे पे लेव्हल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२०० या वेतन श्रेणीमध्ये शासन मंजुर आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० नुसार सह शहर अभियंता पदाची शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. नमुद आहे. त्यानुसार सह शहर अभियंता या पदाच्या रिक्त होणा-या जागांवर सदर पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मधील तरतुदीनुसार सेवा जेष्ठता, शैक्षणिक अर्हता, अनुभव या निकषांस अनुसरुन पात्र ठरणारे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री.मनोज मोतालाल सेठिया, श्री. राजेंद्र वसंतराव राणे, श्री.शिरीष दत्तात्रय पोरेडी, श्री.ज्ञानदेव रामचंद्र जुंधारे व श्री प्रमोद सुधाकर ओंभासे यांना "सह शहर अभियंता (स्थापत्य)" या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपलिकेची सार्वजनिक वाचनालये, स्पर्धा परिक्षा केंद्र ही ज्या क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात आहेत त्या त्या क्षेत्रीय कार्यालयांकडे वर्ग करण्यात आलेली असून त्या प्रकारे कामकाज क्षेत्रीय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली चालू आहे. सार्वजनिक वाचनालये, स्पर्धा परिक्षा केंद्राचे कामकाज पाहणारा सर्व कर्मचारी वर्ग हा क्षेत्रीय कार्यालयामध्ये वर्ग करण्यात आलेला आहे. क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत बहुतेक सार्वजनिक वाचनालये ही सेवाशुल्क तत्वावर इतर संस्थांना चालविणेस देणेत आलेली आहेत सार्वजनिक वाचनालयाकडे ग्रंथपाल कम लिपीक या संवर्गाचे व प्रशासकीय लिपीक संवर्गाचे कामकाज, जबाबदा-या व शैक्षणिक अर्हता एकच असल्याने सद्यस्थितीत महापालिका आस्थापनेवरील लिपीक या संवर्गाचे व प्रशासकीय लिपीक संवर्गाचे कामकाज, जबाबदा-या व शैक्षणिक अर्हता एकच असल्याने सद्यस्थितीत महापालिका आस्थापनेवरील लिपीक संवर्गातील रिक्त जागा विचारात घेता तसेच नोकरभरतीवरील निर्बंध विचारात घेता श्री.योगीता पाटील, ग्रंथपाल कम लिपीक यांना लिपीक या अभिनामाच्या पदांमध्ये दिनांक १३/६/२००७ पासून समावेशन करणेस मान्यता देणेत यावी. तसेच डॉ.यशवंत इंगळे, सन जुलै १९९२ पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये दंतशल्यचिकित्सक या पदावर रुजू झाले आहेत. १९९२ ते आज अखेर ते एकाच पदावर कार्यरत असून सेवाप्रवेश नियमावलीतील अटी शर्ती प्रमाणे त्यांना आजतागायत पदोन्नतीच्या संधी मिळालेली नाही. डॉ.इंगळे हे पुढील तीन वर्षात नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार आहेत. डॉ. यशवंत इंगळे यांचा २९ वर्षाचा प्रदीर्घ अनुभव विचारात घेऊन सेवाप्रवेश नियमावलीमधील शैक्षणिक अर्हता शिथिल करणेस व डॉ.इंगळे यांना वाय.सी.एम.रुग्णालयातील वैदयकीय अधिक्षक/वैदयकीय उपअधिक्षक पदाचा पदभार देण्यास

मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपलिका आस्थापनेवर शासन मंजुर असलेल्या जेष्ठ वैदयकीय अधिकारी या रिक्त पदावर नियमानुसार सेवाज्येष्ठाता, शैक्षणिक पाञता व अनुभव धारण करणारे पाञताधारक सेवाजेष्ठ वैदयकीय अधिकारी डॉ.संजय सोनेकर यांना जेष्ठ वैदयकीय अधिकारी या रिक्त पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास व श्री. दिलीप अनंत करंजखेले अन्नपर्यवेक्षक यांना मनपा अस्थापनेवर समकक्ष पदावर नेमणूक देणेस मान्यता देणेत यावी.

मा.सागर आंगोळकर – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.शर्मिला बाबर – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ६५७ विषय क्रमांक – ३

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/५५१/२०२१, दि.०७/०६/२०२१
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र. ४० दि. १८/०६/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' अभिनामाची १६ पदे S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००मध्ये शासन मंजूर असून ४ पदे रिक्त आहेत. 'ज्येष्ठवैद्यकीय अधिकारी' अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ३१/०५/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व' वैद्यकीय अधिकारी' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवा विषयक तपशिल पडताळून, खालील वैद्यकीय अधिकारी गट–ब यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' पदावर S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

अ.क्र	दि.०१/०१/२०२० रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीतील क्रमांक	वैद्यकीय अधिकारी नावं	पदोन्नतीचा प्रवर्ग
१	१४	डॉ.मंडपे रविंद्र नारायण	ज्येष्ठतेनुसार
२	१५	डॉ.अलवी सय्यद नासेर इब्राहीम	ज्येष्ठतेनुसार

३	१७	डॉ.ढगे शिवाजी त्रिंबकराव	ज्येष्ठतेनुसार

सबब, उपरोक्त वैद्यकीय अधिकारी यांना **S-२३** वेतनश्रेणी र.रु ६७७००–२०८७०० मध्ये 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीनव शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठते नुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **"सहाय्यक संचालक नगररचना"** या संवर्गातील गट-अ मधील दर्जाचे वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेडवेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगा नुसार) शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२१/प्र.क्र.५२/नवि-२२, दिनांक २१ जून २०२१ अन्वये शासन मंजूर झालेले आहे. या पदावर अनुभव व शैक्षणिक पात्रता धारण करणारे पदोन्नतीपुर्व पदावरील कार्यरत असलेले मनपा अधिकारी श्री.प्रशांत शिंपी, नगररचनाकार यांना **"सहाय्यक संचालक नगररचना"** या गट-अ मधील पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "उप आयुक्त" या संवर्गातील गट-अ मधील शासन मान्य रिक्त पदांवर नियमानुसार सेवाजेष्ठता, अनुभव व शैक्षणिक पात्रता धारण करणारे पदोन्नतीपुर्व पदावरील कार्यरत असलेले श्री.अण्णा यशवंतराव बोदडे, सहा. आयुक्त यांना "उप आयुक्त" या गट-अ मधील रिक्त पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर शासन मंजूर असलेल्या सहाय्यक आयुक्त या रिक्त पदांवर नियमा नुसार सेवाज्येष्ठता, शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणारे पात्रताधारक पदोन्नतीपूर्व प्रशासन अधिकारी या पदावरील सेवाज्येष्ठ अधिकारी श्री.दिलीप बबन आढारी व श्री. वामन बाबुराव नेमाणे यांना पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील "सह शहर अभियंता (स्थापत्य)" अभिनामाची ५ पदे पे लेव्हल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२०० या वेतन श्रेणीमध्ये शासन मंजुर आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० नुसार सह शहर अभियंता पदाची शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. नमुद आहे. त्यानुसार सह शहर अभियंता या पदाच्या रिक्त होणा-या जागांवर सदर पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० मधील तरतुदीनुसार सेवा जेष्ठता, शैक्षणिक अर्हता, अनुभव या निकषांस अनुसरुन पात्र ठरणारे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री.मनोज मोतालाल सेठिया, श्री. राजेंद्र वसंतराव राणे, श्री.शिरीष दत्तात्रय पोरेडी, श्री.ज्ञानदेव रामचंद्र जुंधारे व श्री प्रमोद सुधाकर ओंभासे यांना "सह शहर अभियंता (स्थापत्य)" या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपलिकेची

सार्वजनिक वाचनालये, स्पर्धा परिक्षा केंद्र ही ज्या क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात आहेत त्या त्या क्षेत्रीय कार्यालयांकडे वर्ग करण्यात आलेली असून त्या प्रकारे कामकाज क्षेत्रीय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली चालू आहे. सार्वजनिक वाचनालये, स्पर्धा परिक्षा केंद्राचे कामकाज पाहणारा सर्व कर्मचारी वर्ग हा क्षेत्रीय कार्यालयामध्ये वर्ग करण्यात आलेला आहे. क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत बहुतेक सार्वजनिक वाचनालये ही सेवाशुल्क तत्वावर इतर संस्थांना चालविणेस देणेत आलेली आहेत सार्वजनिक वाचनालयाकडे ग्रंथपाल कम लिपीक या संवर्गाचे व प्रशासकीय लिपीक संवर्गाचे कामकाज, जबाबदा-या व शैक्षणिक अर्हता एकच असल्याने सद्यस्थितीत महापालिका आस्थापनेवरील लिपीक या संवर्गाचे व प्रशासकीय लिपनिक संवर्गाचे कामकाज, जबाबदा-या व शैक्षणिक अर्हता एकच असल्याने सद्यस्थितीत महापालिका आस्थापनेवरील लिपीक संवर्गातील रिक्त जागा विचारात घेता तसेच नोकरभरतीवरील निर्बंध विचारात घेता श्री.योगीता पाटील, ग्रंथपाल कम लिपीक यांना लिपीक या अभिनामाच्या पदांमध्ये दिनांक १३/६/२००७ पासून समावेशन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच डॉ.यशवंत इंगळे, सन जुलै १९९२ पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये दंतशल्यचिकित्सक या पदावर रुजू झाले आहेत. १९९२ ते आज अखेर ते एकाच पदावर कार्यरत असून सेवाप्रवेश नियमावलीतील अटी शर्ती प्रमाणे त्यांना आजतागायत पदोन्नतीच्या संधी मिळालेली नाही. डॉ.इंगळे हे पुढील तीन वर्षात नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार आहेत. डॉ. यशवंत इंगळे यांचा २९ वर्षाचा प्रदीर्घ अनुभव विचारात घेऊन सेवाप्रवेश नियमावलीमधील शैक्षणिक अर्हता शिथिल करणेस व डॉ.इंगळे यांना वाय.सी.एम.रुग्णालयातील वैदयकीय अधिक्षक/वैदयकीय उपअधिक्षक पदाचा पदभार देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपलिका आस्थापनेवर शासन मंजुर असलेल्या जेष्ठ वैदयकीय अधिकारी या रिक्त पदावर निमानुसार सेवाज्येष्ठाता, शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणारे पात्रताधारक सेवाजेष्ठ वैदयकीय अधिकारी डॉ.संजय सोनेकर यांना जेष्ठ वैदयकीय अधाकारी या रिक्त पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास व श्री. दिलीप अनंत करंजखेले अन्नपर्यवेक्षक यांना मनपा अस्थापनेवर समकक्ष पदावर नेमणूक देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.शर्मिला बाबर – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६५८ विषय क्रमांक – ४

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.अनुराधा गोफणे, मा.वसंत बोराटे यांचा प्रस्ताव –
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र. ४१ दि.०२/०७/२०२१

शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र./३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मधील बाब क्र.२ व ३ अंतर्गत समाविष्ठ तरतुदीनुसार दि.२५/०५/२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजू असलेले कर्मचारी दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील या निर्णयानुसार पदोन्नती देणेबाबत मान्यता देणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदाच्या जागा रिक्त असल्यामुळे श्रीम.अनघा अविनाश पाठक यांची उपअभियंता या पदावर ९ वर्षे सेवा पुर्ण झालेली असल्यामुळे त्यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या म.न.पा.अस्थापनेवरील मंजूर रिक्त पदावर सेवा नियम २०२० तसेच आकृतीबंध २०२० नुसार व त्यातील तरतुदी नुसार सेवाजेष्ठता, तांत्रिक व शैक्षणिक अर्हता, कार्यानुभव इत्यादी सर्व निकषास अनुसरुन पात्र ठरत आहेत. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यकारी अभियंता स्थापत्य ही पदे रिक्त असल्याने श्रीमती अनघा अविनाश पाठक, उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.योगीता नागरगोजे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा. शर्मिला बाबर – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र .नरवि/कावि/११/१६८/२०२१,
दि.२९/०६/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२० दि.०६/०७/२०२१

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील मंजूर विकास योजनेतील महापालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झालेल्या क्षेत्रातील मौजे भोसरी येथील

स.नं.२०९ व २१० पैकी मध्ये आरक्षण क्र.४०५ उद्यान व त्यालगत उत्तर दक्षिण १२ मी. रस्ता प्रस्तावित आहे. आरक्षण क्र.४०५ उद्यानाचे भूसंपादनानुसार १४३८२.७० चौ.मी.क्षेत्राचा ताबा दि.०७।१०।२००५ रोजी महापालिकेस भूसंपादनाने मिळालेला आहे. परंतु सदर १२ मी. रस्त्यामध्ये गरीब नागरिकांची घरे असल्याने मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांची घरे नपाडता सदर रस्ता स.नं.२१० पैकी मध्ये मनपाचे मोठ्या गटाराच्या पश्चिमेला लागून स्थलांतरीत करणेबाबत व सदर रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे क्षेत्र त्यांचेच मालकीचे स.नं. २११/१ पैकी मधून घेणेबाबत संबधित जागामालक यांनी दि.२४।०३।२००५ रोजी महापालिकेकडे प्रस्ताव सादरकेलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अर्जदाराकडून स.नं.२११।१ चे ७।१२ नुसार त्यांचे मालकीची जागा दर्शविणारा मोजणी नकाशा घेऊन रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी.क्षेत्राचा रितसर ताबा घेऊन तदनंतरच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेतील दक्षिणोत्तर १२ मी.रस्त्याची आखणी व आरक्षणाची स.नं.२११/१ मधील ताब्यात घेतलेल्या २२४४ चौ.मी.क्षेत्रासह होणारी सुधारित हद्द असा फेरबदलाची कार्यवाही करणेचे प्रस्तावास तत्कालीन मा.आयुक्त यांनी दि.२५।११।२००५ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने संबधित जागा मालक यांचेकडून ७/१२ उतारा, रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्राची मोजणी नकाशा, टायटल सर्च रिपोर्ट तसेच यु.एल.सी. बाबत र.रू.३००/- चे मुद्रांकावर शपथपत्र व बंधपत्र लिहून घेण्यात आलेले आहे. सदर ताब्यात घ्यावयाच्या क्षेत्र बक्षिसपत्राने ताब्यात घेणेकामी बक्षिसपत्राचा मसुदा तसेच मालकी बाबत कायदा सल्लागार, पिपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दि.२२।०६।२००९ रोजी अभिप्राय घेवून अर्जदाराकडून शपथपत्र बंधपत्र लिहून घेऊन दि.१० सप्टेंबर २००९ रोजी रस्ता फेरबदल केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्र स.नं.२११/१ पैकी मधून बक्षिसपत्राने मनपाचे ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर दस्त दुय्यम निबंधक हवेली १७ - ०८७५२, दि.३०।०९।२००९ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. तसेच सदर ताब्यात घेतलेल्या २२४४ चौ.मी.क्षेत्रासाठी फेरफार क्र.२४७१४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेली असूनतसा सुधारित ७/१२ उतारा व फेरफार दि.०३।१२।२०१० रोजीच्या पत्रान्वये कामगार तलाठी, भोसरी यांनी महापालिकेकडे पाठविलेला आहे. सबब, सदर ठिकाणी आजच्या जागेवरच्या परिस्थितीनुसार विकास योजनेत बदल करणे क्रमप्राप्त आहे. सदर फेरबदला नंतर उत्तर दक्षिण १२ मी रस्त्याची भूसंपादनाची पुढील कार्यवाही करणे शक्य होईल. प्रस्तुत प्रकरणी दक्षिणउत्तर १२ मी.रस्त्यामधील गरीब नागरिकांची घरे वाचविणेचे दृष्टीने मनपाचे मोठ्या गटाराला लागून पश्चिमेकडे १२ मी. रस्ता आखणी करणेकामी व रस्ता आखणी बदलल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे स.नं. २११/१ मधून मनपाच्या ताब्यात घेतलेल्या क्षेत्रानुसार आरक्षणाचे हद्दीमध्ये महाराष्ट्र व प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व फेरबदलाची कार्यवाही करणेस व फेरबदलाची सुचना प्रसिध्द झाल्यानंतर महापालिकेस प्राप्त होणा-या हरकती/सुचना अर्जांबाबत संबधितांना सुनावणी देणे तद्अनुषंगीक वैधानिक प्रक्रीया पुर्णकरून फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजूरीस्तव

सादर करणे यासाठी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेत यावी.

मा.योगीता नागरगोजे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - मा.महापालिका सभा मंजुर ठराव क्र.६५० दि.१८/०६/२०२१ मध्ये- "महाराष्ट्र राज्य शासन नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३६ अन्वये गाव मौजे चोविसा वाडी येथील गट क्र.९२ यासी क्षेत्र ९८ आर क्षेत्र ग्रीन झोन मध्ये विकास योजनेत दर्शविलेले आहे." या वाक्यातील "कलम ३६ ऐवजी कलम ३७" याप्रमाणे दुरुस्ती करुन त्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजूर विकास आराखडयातील मौजे ताथवडे येथील स.नं. ४१/४ पै.मधील आरक्षण क्र. २६ रिटेल मार्केट (Informal Sector) व आरक्षण क्र. २७ पार्किंग या प्रयोजनाकरीता १ हे-४ आर क्षेत्र प्रस्तावित करणेत आले आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर आरक्षणाची जागा रिटेल मार्केट (Informal Sector) व पार्किंग या आरक्षणा ऐवजी निवासी विभागात समाविष्ठ करणेस फेरबदलासाठी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार आरक्षण फेरबदलाची संपुर्ण कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे, हरकती, सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील वाकड परीसरातील गट नं १०९ मधील खाजगी जागेमधील रस्ता महानगरपालिकेने जागा मालकांकडून कोणताही ताबा न घेता रस्ता केलेला आहे. त्या जागे शेजारी ३० मीटर रुंदीचा डी.पी.मध्ये आहे व जागेवर त्याचे काम चालू आहे त्यामुळे खाजगी जागेतील सद्यस्थितीमध्ये जागेवर केलेला रस्ता रद्द करणेस मान्यता देणेत यावी. तसेच मौजे ताथवडे येथील स.नं. ६९,७५,१४०,१४१ पै. व १४२ पै मध्ये मंजुर विकास योजनेत १५.० मी. व १८ मी. रुंद रस्ता दर्शविलेला आहे. सदर रस्त्यांच्या पुर्व व पश्चिम बाजुस २४.० मी. रुंदीचा रस्ता विकास योजनेत दर्शविलेला आहे त्यामुळे चौकात वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे. तरी स.नं. ६९, ७५, १४०, १४१ पै. व १४२ पै मधील १५.० मी. व १८.० मी. रुंदीचा रस्ता २४ मी. रुंदीचा करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास व फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासनास फेरबदलाचा प्रस्ताव सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.सागर आंगोळकर – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.शर्मिला बाबर – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ६५९ विषय क्रमांक – ५

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र .नरवि/कावि/११/१६८/२०२१, दि.२९/०६/२०२१

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२० दि.०६/०७/२०२१

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील मंजूर विकास योजनेतील महापालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झालेल्या क्षेत्रातील मौजे भोसरी येथील स.नं.२०९ व २१० पैकी मध्ये आरक्षण क्र.४०५ उद्यान व त्यालगत उत्तर दक्षिण १२ मी. रस्ता प्रस्तावित आहे. आरक्षण क्र.४०५ उद्यानाचे भूसंपादनानुसार १४३८२.७० चौ.मी.क्षेत्राचा ताबा दि.०७।१०।२००५ रोजी महापालिकेस भूसंपादनाने मिळालेला आहे. परंतु सदर १२ मी. रस्त्यामध्ये गरीब नागरिकांची घरे असल्याने मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांची घरे नपाडता सदर रस्ता स.नं.२१० पैकी मध्ये मनपाचे मोठ्या गटाराच्या पश्चिमेला लागून स्थलांतरीत करणेबाबत व सदर रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे क्षेत्र त्यांचेच मालकीचे स.नं. २११/१ पैकी मधून घेणेबाबत संबधित जागामालक यांनी दि.२४।०३।२००५ रोजी महापालिकेकडे प्रस्ताव सादरकेलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अर्जदाराकडून स.नं.२११।१ चे ७।१२ नुसार त्यांचे मालकीची जागा दर्शविणारा मोजणी नकाशा घेऊन रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी.क्षेत्राचा रितसर ताबा घेऊन तदनंतरच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेतील दक्षिणोत्तर १२ मी.रस्त्याची आखणी व आरक्षणाची स.नं.२११/१ मधील ताब्यात घेतलेल्या २२४४ चौ.मी.क्षेत्रासह होणारी सुधारित हद्द असा फेरबदलाची कार्यवाही करणेचे प्रस्तावास तत्कालीन मा.आयुक्त यांनी दि.२५।११।२००५ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने संबधित जागा मालक यांचेकडून ७/१२ उतारा, रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्राची मोजणी नकाशा, टायटल सर्च रिपोर्ट तसेच यु.एल.सी. बाबत र.रू.३००/- चे मुद्रांकावर शपथपत्र व बंधपत्र लिहून घेण्यात आलेले आहे. सदर ताब्यात घ्यावयाच्या क्षेत्र बक्षिसपत्राने ताब्यात घेणेकामी बक्षिसपत्राचा मसुदा तसेच मालकी बाबत कायदा सल्लागार, पिपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दि.२२।०६।२००९ रोजी अभिप्राय घेवून अर्जदाराकडून शपथपत्र बंधपत्र लिहून घेऊन दि.१० सप्टेंबर २००९ रोजी रस्ता फेरबदल केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्र स.नं.२११/१ पैकी मधून बक्षिसपत्राने मनपाचे ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर दस्त दुय्यम निबंधक हवेली १७ - ०८७५२, दि.३०।०९।२००९ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. तसेच सदर ताब्यात घेतलेल्या २२४४ चौ.मी.क्षेत्रासाठी फेरफार क्र.२४७१४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेली असूनतसा सुधारित ७/१२ उतारा व फेरफार दि.०३।१२।२०१० रोजीच्या पत्रान्वये कामगार तलाठी, भोसरी यांनी महापालिकेकडे पाठविलेला आहे. सबब, सदर ठिकाणी आजच्या जागेवरच्या परिस्थितीनुसार विकास योजनेत बदल करणे क्रमप्राप्त

आहे. सदर फेरबदला नंतर उत्तर दक्षिण १२ मी रस्त्याची भूसंपादनाची पुढील कार्यवाही करणे शक्य होईल. प्रस्तुत प्रकरणी दक्षिणउत्तर १२ मी.रस्त्यामधील गरीब नागरिकांची घरे वाचविणेचे दृष्टीने मनपाचे मोठ्या गटाराला लागून पश्चिमेकडे १२ मी. रस्ता आखणी करणेकामी व रस्ता आखणी बदलल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे स.नं. २११/१ मधून मनपाच्या ताब्यात घेतलेल्या क्षेत्रानुसार आरक्षणाचे हद्दीमध्ये महाराष्ट्र व प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व फेरबदलाची कार्यवाही करणेस व फेरबदलाची सुचना प्रसिध्द झाल्यानंतर महापालिकेस प्राप्त होणा-या हरकती/सुचना अर्जांबाबत संबधितांना सुनावणी देणे तद्अनुषंगीक वैधानिक प्रक्रीया पुर्णकरून फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करणे यासाठी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभा मंजुर ठराव क्र.६५० दि.१८/०६/२०२१ मध्ये- "महाराष्ट्र राज्य शासन नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३६ अन्वये गाव मौजे चोविसा वाडी येथील गट क्र.९२ यासी क्षेत्र ९८ आर क्षेत्र ग्रीन झोन मध्ये विकास योजनेत दर्शविलेले आहे." या वाक्यातील "कलम ३६ ऐवजी कलम ३७" याप्रमाणे दुरुस्ती करुन त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मंजूर विकास आराखडयातील मौजे ताथवडे येथील स.नं. ४१/४ पै.मधील आरक्षण क्र. २६ रिटेल मार्केट (Informal Sector) व आरक्षण क्र. २७ पार्किंग या प्रयोजनाकरीता १ हे-४ आर क्षेत्र प्रस्तावित करणेत आले आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर आरक्षणाची जागा रिटेल मार्केट (Informal Sector) व पार्किंग या आरक्षणा ऐवजी निवासी विभागात समाविष्ठ करणेस फेरबदलासाठी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार आरक्षण फेरबदलाची संपुर्ण कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे, हरकती, सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील वाकड परीसरातील गट नं १०९ मधील खाजगी जागेमधील रस्ता महानगरपालिकेने जागा मालकांकडून कोणताही ताबा न घेता रस्ता केलेला आहे. त्या जागे शेजारी ३० मीटर रुंदीचा डी.पी.मध्ये आहे व जागेवर त्याचे काम चालू आहे त्यामुळे खाजगी जागेतील सद्यस्थितीमध्ये जागेवर केलेला रस्ता रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे ताथवडे येथील स.नं. ६९,७५,१४०,१४१ पै. व १४२ पै मध्ये मंजुर विकास योजनेत १५.० मी. व १८ मी. रुंद रस्ता दर्शविलेला आहे. सदर रस्त्यांच्या पुर्व व पश्चिम बाजुस २४.० मी. रुंदीचा रस्ता विकास योजनेत दर्शविलेला आहे त्यामुळे चौकात वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे. तरी स.नं. ६९,७५,१४०,१४१ पै. व १४२ पै मधील १५.० मी. व १८.० मी. रुंदीचा रस्ता २४ मी. रुंदीचा करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास व फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासनास फेरबदलाचा प्रस्ताव सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.शर्मिला बाबर - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ६

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सुनिता तापकीर, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव –

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२२ दि.०६/०७/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०७/नवि-१३, दि.९ जुलै २००८, शासन निर्णय क्र.टिपीएस १८०९/१९८५/प्र.क्र.१८९३/०९/नवि-१३, दि.१८/०८/२००९ व अधिसुचना क्र.टिपीएस-१८१२/१६०/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ई.पी.-मंजूरी/नवि-१३, दि.०२/०३/२०१५ अन्वये मंजूर असलेल्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. दिघी-भोसरी शिवेलगत मंजूर विकास योजनेतील १५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. मधील १५.०० मी. रुंद रत्याचे आरक्षण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आहे. मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. मधील १५.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा.नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतुकीसाठी रस्ता विकसीत होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांच्या वाहतुकीच्या हितार्थ मौजे भोसरी व दिघी स.नं.७३ व ७४ पै. येथील सावंतनगर कमानीपासून पुढे ते बी.यु.भंडारी येथील गृहप्रकल्पापर्यंत मंजूर विकास योजनेतील १५.०० मी.रस्ता हा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये ९.०० मी. करणेस मान्यता देणेत यावी.

मा.योगीता नागरगोजे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, हा सदस्य प्रस्ताव आहे आणि याच्यामध्ये हा जो रस्ता आहे तो भोसरी आणि दिघी अशा दोन गावामधला रस्ता आहे आणि सदस्यांनी दिघीच्या हद्दीतला रस्ता ९.०० मी. करावा अशी सूचना केलेली आहे. तो रस्ता ९ मी. केलातर भोसरी आणि दिघीच्या हद्दीतीलही रस्ता ९ मी. करावा लागेल त्याच्यामुळ एक तर करायचा असेलतर सलग १५ मी. ठेवा किंवा सलग ९ मी. ठेवा असा केलातर तो एकसारखा राहील.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- भोसरी हद्दीतून दिघी हद्दीला जाणारा सर्वच रस्ता ९ मी.चा करणेस मान्यता देणेत यावी.

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.शर्मिला बाबर – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आली असता-

ठराव क्रमांक- ६६० विषय क्रमांक – ६

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सुनिता तापकीर, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२२ दि.०६/०७/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०७/नवि-१३, दि.९ जुलै २००८, शासन निर्णय क्र.टिपीएस १८०९/१९८५/प्र.क्र.१८९३/०९/नवि-१३, दि.१८/०८/२००९ व अधिसुचना क्र.टिपीएस-१८१२/ १६०/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ई.पी.-मंजूरी/नवि-१३, दि.०२/०३/२०१५ अन्वये मंजूर असलेल्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. दिघी-भोसरी शिवेलगत मंजूर विकास योजनेतील १५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. मधील १५.०० मी. रुंद रत्याचे आरक्षण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आहे. मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. मधील १५.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा.नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतुकीसाठी रस्ता विकसीत होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांच्या वाहतुकीच्या हितार्थ मौजे भोसरी व दिघी स.नं.७३ व ७४ पै. येथील सावंतनगर कमानीपासून पुढे ते बी.यु.भंडारी येथील गृहप्रकल्पापर्यंत मंजूर विकास योजनेतील १५.०० मी.रस्ता हा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये ९.०० मी. करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच भोसरी हद्दीतून दिघी हद्दीला जाणारा सर्वच रस्ता ९ मी.चा करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.आशा धायगुडे-शेंडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमाक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ६६१ विषय क्रमांक – ७

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.सुनिता तापकीर, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समिती कडील ठ.क्र.२३ दि.०६/०७/२०२१

मौजे दापोडी येथील स.नं.३६ मधील ३०.०० मी सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजूची स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या भिंतीला लागून व यांत्रिकी भवन, दापोडी यांच्या इमारती मागील जागा मंजूर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागात समाविष्ट आहे. सदर जागा ही पुर्णपणे नदी ते निळी पुररेषेखाली असल्याकारणाने सदर जागा महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागास प्रस्ताव सादर करुन त्यावर खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी व उद्यानासाठी १ हेक्टर (२.४७ एकर) क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन व म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ अन्वये वैधानिक कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.शर्मिला बाबर - मा.महापौर साहेब, विषय क्रमाक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ६६२ विषय क्रमांक – ८

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.अनुराधा गोरखे, मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२४ दि.०६/०७/२०२१

पिंपरी चिंचवड शहरातील दापोडी व लगतचे परिसरात मोठ्या प्रमाणात दाट लोकवस्ती असून झोपड्यांचे प्रमाण जास्त आहे. तसेच पवना नदीमुळे दरवर्षी पावसामुळे पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे दापोडी येथील स.नं.३६ मध्ये औद्योगिक विभाग तसेच निळया व लाल पुररेषात सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या उजव्या बाजून ८० गुंठे जागा कार्यशाळा व्यवस्थापक, एस.टी.महामंडळ व महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर करून सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यानंतर मंजूर विकास आराखड्यामधील जागेवरील औद्योगिक विभागावर अग्निशमन केंद्राचे आरक्षण प्रस्तावित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाबाबत कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.योगीता नागरगोजे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.शर्मिला बाबर - मा.महापौर साहेब, विषय क्रमाक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ६६३ विषय क्रमांक – ९

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.नरवि/कावि/०६/७७/२०२१
दि.१५/०६/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट मौजे ताथवडे येथे गावठणातील मिळकतींचे सिटी सर्व्हे करणेबाबत उप अधिक्षक, भूमि अभिलेख, मुळशी (पौड) यांचे दि.२५/०१/२०२१ चे पत्र मनपास प्राप्त झाले असून सदर पत्रामध्ये मौजे ताथवडे, ता. मुळशी, जि.पुणे येथील गावठाण विभागातील सिटीसर्व्हे करणेबाबत महानगरपालिकेचा संमती दर्शक ठराव करुन उप अधिक्षक भुमि अभिलेख यांचे कार्यालयास पाठविणे बाबत कळविले आहे. सबब मौजे ताथवडे, ता. मुळशी, जि.पुणे येथील गावठाण विभागातील सिटी सर्व्हे करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.योगीता नागरगोजे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

मा.शर्मिला बाबर - मा.महापौर साहेब, विषय क्रमाक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १०

दिनांक – २९/७/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अति.आयुक्त (१) आयुक्त यांचेकडील
जा.क्र.विमुका/गक्षे/कावि/४८३/२०२१ दि.१५/०६/२०२१

पिंपरी चिंचवड मनपाचे ग प्रभाग कार्यक्षेत्रात नव्याने थेरगाव येथे हॉस्पिटलचे काम अंतिम टप्प्यात असुन नजिकच्या काळात करोना विषाणुचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता करोनाच्या रुग्णाचे अलगिकरण करणे करीता तात्पुरत्या स्वरुपात थेरगाव रुग्णालयाचा वापर करणेत येणार असल्याने, वसध्या पिंपरी येथील जिजामाता हॉस्पीटल करोनाच्या पेशंट करीता वापरणेत येत असुन, त्या हॉस्पीटल मधील विज पुरवठा खंडीत झाल्यास आय.सी.यु. मध्ये, तातडीने पर्यायी विज पुरवठ्या करीता यु.पी.एस. यंत्रणा बसविणे आवश्यक असल्याने त्या कामाची पाहणी करुन कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्यास रक्कम

रु.५५,६८,२४२/- इतका खर्च आपेक्षीत आहे. सदर कामाकरीता सन २०२१-२०२२चे अंदाजपत्रकीय तरतुद करणेत आलेली नसल्याने सदरचा खर्च मुख्य कार्यालय मध्यवर्ती भांडार विभागा कडील “कोरोना निधी” या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे. सदर कामास व र.रु.५५,६८,२४२/- (अक्षरी र.रु.पंचावन्न लाख अडूसष्ट हजार दोनशे बेचाळीस फक्त) च्या खर्चास प्रशासकीय मान्याता देणेत येत आहे.

मा.योगीता नागरगोजे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड शहरामधील "प्रभाग क्र.१६ रावेत येथील पेठ क्र.३२ अ मधील मोकळ्या जागेतील उद्यानाचे विद्युत विषयक कामे करणे " बाबत मागणी होत आहे. सदरच्या कामाचा सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात समावेश करून रक्कम रूपये ५.०० कोटी यास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच सदर कामासाठी खालीलप्रमाणे तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

अ. क्र.	कामाचे नाव	लेखाशिर्ष	पा.क्र.	अ.क्र	प्रशासकीय मान्यतारक्कम रू	सन २०२१-२२ मुळ तरतूद	वाढ	घट	सुधारित तरतूद	शेरा
१	प्रभाग क्र.१६ रावेत येथील पेठ क्र.३२ अ मधील मोकळ्या जागेतील उद्यानाचे विद्युत विषयक कामे करणे	उद्याने (ब मुख्यालय)	३५३	२	५००००००	०	५०००००	०	५०००००	अ.क्र.२ वरून वर्ग
२	मामुर्डी स्मशानभुमी येथे विद्युत दाहिनी बसविणे व विद्युत विषयक कामे करणे.	स्थापत्यप्रकल्प अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे (ब मुख्यालय)	३७७	२२	२०००००००	५०००००	०	५०००००	०	अ.क्र.१ वर वर्ग
एकूण						५०००००	५०००००	५०००००	५०००००	

